'पखालीचे पाणी' कविता ग्रामीण जीवनाचे यंत्रवत जीवन दर्शवते. तसेच यांत्रिकता व दारिद्र्य दाखवते. कधी बळीराजा सुखावतो तर खूप वेळा त्याला भूक सतावते. चटणी-भाकरीची गोडी साखरेतच विरघळून जाते. झेंडावंदनात देशाची महानता गायली जाते. पण खरी महानता कष्टकऱ्यांच्या जीवनाचे विद्रूप चित्रण दाखवते. रोपापासून मापापर्यंत लुबाडणूक ही शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पूजली आहे. बाजारात मालाची लयलूट केली जाते. कष्टाची तोलाई सोडून बनवाबनवीत शेतकऱ्यांना अटकवले जाते.

'अश्विनी' नावाच्या कवितेत किटकनाशक पिऊन मेलेल्या अश्विनीसारख्या कित्येक मुलींची वेदना प्रदर्शित करते. 'सत्व' कविता पेरणी आधीच लगीनघाई आणि घोटभर पाणी घेऊन कष्टाची लाहीलाही होत जीवन जगण्याच्या कित्येक यंत्रवत मनुष्याची वेदना येथे दिसते. मातीवर रंगणारी मुले, पायात घुटमळणारे कपडे आणि वाटेवर मोकळं चालायला लावणारे बांधाचे रस्ते ग्रामीण आयुष्याचा अविभाज्य घटक बनते. 'सखा' कविता बाजारात आपले बैल विकणाऱ्या शेतकऱ्यांची लूट दर्शवते. लेकराप्रमाणे वाढवलेला बैल कसायाच्या घशात दारिद्र्यामुळे घालावा लागतो.

'काळाबरोबर चालताना' कविता मेथीच्या पेंड्या दहाला तीन. दहा रुपयात मूठभर मॅगी. यामध्ये शेतकऱ्यांची लुबाडणूक आणि उद्योगपतींचा धबधबा दर्शवते. 'अधांतरी' कवितेत लुगड्यासाठी आसुसलेली आई हुंदका देते पण लुगड्याची इच्छा पूर्ण होत नाही. ठिगळ्यांच्या आधारातच निराधार जीवन पुढे सरकत जाते. 'शेवट बदलले असते' कवितेत शेतकऱ्यांना नाईलाजाने विकाव्या लागणारे जमिनींची वेदना दर्शवते. कवडीमोल भावाने घेतलेली जमीन गुंठे, प्लॉट, इंच, फुट लाख मोलाची झाली. 'धरणातलं पाणी आटल्यावर' शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी वाहायला सुरू होते.

*''कावडीत आणलेलं*
*वाड्यातल्या आडाचं शेवटचं पाणी म्हणजे*
*गंगाजलच असतं मरेपर्यंत पुरणारं''*

जीवापाड कष्ट उपसून कर्ज काढून उभारलेलं पीक डोळ्यादेखत जळायला

लागतं. गावातील भाऊबंदकी, राजकारण, अंधश्रद्धा, उपास-तपास या ग्रामीण जीवनाच्या छटा आहेत. 'परिवर्तनाच्या नावाने' कविता कमिशनवाल्यांना वैतागून कृषी सेवा केंद्र थाटल्या गेल्या. कुणाची सेवा केली आणि कुणाची लुबाडणूक हे देवच जाणे. गावात गाजराच्या पुंगीवर परिवर्तनाच्या गप्पा डोलतात.

'म्हातारा' कविता ग्रामीण दारिद्र्य दर्शवते. मीटर पडतो म्हणून रात्रभर अंधारात आणि गरमीत हाताचा पंखा करून मच्छरांची आणि हवेची व्यवस्था करतो. 'रानभर मी' कविता डोक्यावर भारा घेऊन चिखलमाती तुडवणारी स्त्री चीक थेंब थेंब गळत आणि कष्टकरी स्त्रीचे रक्त आणि घाम ओघळलेले गावात पाहायला मिळते.

*''मड्याच्या चोचल्यापेक्षा*
*जीत्यांना जपा म्हणत*
*कुणाच्याही मयतीत*
*बरळतो म्हातारा''*

'खस्ता' कविता श्रीखंड-पुरीचे ताट कष्टकऱ्यांना फक्त स्वप्नातच दिसते. खस्ता खातच लेकरं मोठी होतात. खस्ता खाणाऱ्याना पोटभर कुठून मिळणार? 'कोणीच का बोलत नाही' या कवितेत गावातील आरोग्य व्यवस्थेवर व्यंग करते. कुटुंब नियोजन करा अशा हाका दिल्या जातात. पण कुटुंबाचे नियोजन फक्त संख्येवरून करणे शक्य नाही. त्यासाठी रोजीरोटीची व्यवस्थापन महत्त्वाचे असते. 'मायलेक' कविता लग्नानंतरच्या आणि पूर्वीच्या माय-लेकीच्या संबंधाची ग्वाही देते. लेक आणि माय सुद्धा जात्यावर दळताना एक दुसरीला संबोधत असतात. कधी काळी मुलगी ओझं वाटत होती. आज तिच्याविना जीवन ओझं वाटतं. 'संपवत कसं नाहीस' कवितेत ग्रामीण स्त्रीचे बाळंतपण, तिचे बोचके, घराची दशा आणि सुई दोऱ्यापर्यंत कुंकू ते करड्यापर्यंत नशिबाशी थट्टा दर्शवते. कष्टकरी बापाची आत्महत्या, वृद्धाश्रम इत्यादीवर कविता छान करता येते, पण आत्महत्या आणि वृद्धाश्रम हे लिहायचे नाही तर जगण्याचे विषय असतात. हे फक्त कष्टकरी आणि ज्यांचे कोणी नाही किंवा असून पोरके झालेलेच  जाणतात.

'आतन पेटून उठताना' कविता जगापुढे हात पसरून जगायचे नाही हा संदेश देते. जुगारानं कसं आयुष्य मातीमोल होतं, जिने गावातील जगणं आणि रोजगार चारी मुंड्या चीत केले आहे. दारू, जुगार आणि तंटे गावातील जगणे असह्य करते. पोटाची खळगी भरण्यापेक्षा आपापसातील वाद आणि अंधश्रद्धा सण-उत्सवांची जंत्री माणसाला मेटाकुटीला आणतात. हीच ग्रामीण जीवनाची



सत्यता आहे. 'लपण्याजोग राहीलं नाही' या कवितेत शेतकऱ्यांच्या जगण्याचे सत्य उघड झाले आहे. थोडीशी हिरवळसुद्धा हिरावली जात आहे. मातीकडे पून्हा वळावं की नको अशा द्विधा मनःस्थितीत ग्रामीण जीवन अडकले आहे. बोंबील आणि सुकटावरच कष्ट करणाऱ्यांना भागवावे लागते आहे. आई बापाच्या इस्टेटीवरचे भांडण डॉम्बुलन्सच्या आवाजापर्यंत पोहोचते. गांधीजींचे 'खेड्याकडे चला' हे तत्त्व म्हणता म्हणता खेडे ग्लोबल झाले. त्यात शेतकरी बलहिन आणि विकला गेला. औद्योगिक क्रांती फक्त कागदावरच दिसते. कृत्रिम पावसात जंगलातील पशू-पक्षी आणि पिके सुद्धा कृत्रिम झाली. मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल गावकऱ्यांसाठी जुगारासारखे झाले. 'पाणी अडवा आणि पाणी जिरवा'साठी खजाना उघडला गेला. परंतु सामान्य कष्टकरी मात्र हवालदिलच राहिला. कष्टकऱ्यांची अवस्था फार दयनीय झाली. शेती उपयुक्त अवजारे व्यतिरिक्त पिस्तुलाही इथपर्यंत पोहोचल्या आहेत. तरीही दुर्दम्य इच्छाशक्तीने इथला माणूस जगतो आहे. 'दिल्या घरी' कविता सुखी संसाराचा आशीर्वाद देते तसेच समजूतदारपणा ही प्रदान करते. पाण्याच्या तलावावर उकरलेला रस्ता रिकाम्या मुठीतून नवनिर्माण करण्याची इच्छा फुलवते. कुत्री, मांजरं, नाडीचं रिंगण, सोनं मोडून सोयर जोडण्याची प्रक्रिया आणि दान धर्माची परंपरा चीनच्या भिंती प्रमाणे अभेद आहे. फाटक्या गोधडीप्रमाणे फाटलेला संसार आणि विस्कटलेली घडी जीव ओतून पुढे रेटण्याचा प्रयत्न कितीही वेळा अयशस्वी झाला तरी पळीभर तेलावर व ओंजळभर पिठावर संसाराची गाडी ग्राम वैभव घेऊन पुढे चालताना दिसते.

कवयित्री कल्पना दुधाळ यांच्या या कवितासंग्रहात ग्रामीणतेचे दर्शन घडवणाऱ्या सर्व खाणाखुणा दिसतात. ग्रामीण स्त्रियांच्या वेदना, घुसमट, शेतकऱ्यांची गळचेपी त्यातून व्यसन आणि कर्जबाजारीपणा यातून होणाऱ्या आत्महत्या, संसार चालवण्यासाठी स्त्रीला करावी लागणारी ओढाताण, यातून तिचे आयुष्यात होणारी ससेहोलपट ग्रामीण दारिद्र्य, निसर्गावर, प्राण्यांवर असणारे प्रेम, बैल विकताना होणारी अगतिकता आणि अगतिकतेला असणारी सर्व कारणे  त्यांच्या कवितेत दिसून येतात.

ग्रामीण माती, ग्रामीण समारंभ, ग्रामीण परंपरा, ग्रामीण भाषा, याचीही प्रचिती कल्पना दुधाळ देतात. 'धग असतेच आसपास' यातून ग्रामीणतेचा ठसा गडद होत जातो. एकविसाव्या शतकातला जरी कवितासंग्रह असला तरी इतर सर्व बदल शेतकऱ्यांची दुःख, दारिद्र्य, ससेहोलपट, फसवणूक, पिळवणूक हे

मात्र बदललेले नाही, हे या कवितासंग्रहाच्या आधाराने अधोरेखित होते. 'सखा आणि 'चलाखीच धड' या कवितेत प्राणिमात्रांवर प्रेम करणारी ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवले आहे जनावर विकत घेताना संसारात होणारी ओढाताण दाखवली आहे.

*''बैल विकून कासरा घेतला,*
*कासरा विकून बैल घेतला*
*फिरून फिरून तिथेच गुंतलो''*

यातून ही ओढाताण करण्यातच सगळा आयुष्य संपलं आणि गोळाबेरीज परत तिथेच येऊन शेतात पडलेले धान्य वेचण्यातच आयुष्य संपतं. हीच ग्रामीण जीवनाची शोकांतिका आहे. चलाखीचे धड कवितेत जनावरांना कसायाला न विकण्याचा सल्ला शेतकरी देतो. शेतीसाठी राब राब राबणारी जनावरं चार पैसे जास्त मिळतात म्हणून कसायाला विकून त्यांचा खून शेतकरी पाहू शकत नाही. स्वतःचा तो तोटा सहन करू शकतो पण ज्याने आपल्या संसारात मुकाट्याने मदत केली त्यांचा मृत्यू नैसर्गिकपणे व्हावा ही भावना शेतकऱ्याची असते हेच सिद्ध होते.

'आधीच ऐकू येते' या कवितेत अवकाळी झालेल्या पावसाने शेतीचे नुकसान होते. अशा घटना वारंवार होतात. हवामानाच्या अंदाजापेक्षा शेतकऱ्यांची भीती खरी ठरते आणि पावसामुळे शेतीचे नुकसान होते. मोडून पडलेल्या माणसाला जगण्यासाठी टेकू लावून जगावं लागतं. आधीच दारिद्र्यात, नैसर्गिक आपत्तीत शेतकरी आणखीनच दरिद्री होतो आहे. दुष्काळाचा फेरा सुटत नाही तरी तो सकारात्मकतेने जगतो आहे. हीच त्याची जगण्याची आशा असते. वडिलोपार्जित जमीन दारिद्र्याशी झगडण्यासाठीच विकावी लागली. नंतर कोणताही विषय जमीन विक्रीवर येतो तेव्हा विकणारा गलीतगात्र होतो. कवडीमोलाने विकलेल्या जमिनीची त्याची किंमत पाहून आपली फसवणूक झाल्याचे कळते. गरिबी जाण्यासाठी जमीन विकली पण दारिद्र्य गेले नाही. थोडा धीर धरला असता तर वेळ सरली असती आणि विकलेल्या जमिनीत रखवालदार म्हणून राहण्याची वेळ आली नसती. काठी आपटत होणाऱ्या वेदना 'शेवट बदलले असते' या कवितेत स्पष्ट केले आहे.

'धग असतेच आसपास' या कवितेत स्त्रियांची वेदना सांगितली आहे. देवाकडेसुद्धा तिला दुजाभाव भोगावा लागतो. सगळं त्याग करूनही तिला शापित जीवन जगावे लागते.



*''शब्दांच्या उमेदीलाच*
*जळून खाक होण्याचे शाप मिळाले.''*

अशा शब्दात ती व्यथा मांडते. भूमीशी नाते टिकवण्यासाठी ती सर्व सहन करते. स्त्रीला गाभाऱ्यात प्रवेश नाही, हे माहीत असून सुद्धा रानोमाळ फिरून, रुईची पाने गोळा करते. या लढाईत सर्व जळत नसले तरी त्या आगीची धग मात्र तिला जाणवते. 'टीपर' कवितेमध्ये शेतकरी जीवनाची व्याख्या सांगताना शेतकरी पोशिंदा आहे, असा उदोउदो होतो. परंतु त्याची स्थिती काय आहे त्याचे चित्रण केले आहे. जशी ऊसाची अवस्था आहे की तो चघळल्यावरच गोड लागतो. उभारल्यावर बक्कन पाठीत बसतं आणि घुमवल्यावर समोरच्याची पळता भुई थोडी होते. शेतकऱ्याची तशीच अवस्था आहे. शेतकऱ्यांच्या जीवावर जगतो म्हणायचं, त्याच्या समस्यांची फक्त चर्चा करायची की शेतकरी खुश. शोषक वर्ग ऊसाचं टिपरू चघळत बसतो आणि त्याला गोडवा येतो. तेच शेतकऱ्यांने आंदोलन केलं तर जग हादरते आणि आंदोलन खूप पेटले तर सरकारला पळता भुई थोडी होते. म्हणून त्या शेतकऱ्याला उसाच्या टिपूरसारखं माती चिखलात रेटायचं आणि वर्षभर त्याने स्वतः गोड चव घेत राहायचं. शेतकऱ्याची अवस्था सोडता नाही येत नाही आणि धरता येत नाही अशी आहे म्हणून कवयित्री म्हणते,

*''पण आता आलं लक्षात*
*एकदा का दाबले टिपरू*
*चिखल सोडता येत नाही*
*चिखलात घुसलं*
*म्हणून पाय तोडता येत नाही''*

ऊसाला दर नाही त्यामुळे घातलेलं सुद्धा निघत नाही फक्त हिरव्या वाडाकडे बघून शेतकरी नंदनवन म्हणून समाधान पावतो.

ग्रामीण प्रवृत्तीचा आशावाद, एकत्र कुटुंबपद्धती एकमेकांना साहाय्य करून जगणारी माणसं इथे दिसतात. सर्वांना सोबत घेऊन आयुष्य जगतात. जोपर्यंत सोबत येत नाही तोपर्यंत पुढचा पुढे जात नाही. सहकार्याची भूमिका बजावणारी ग्रामीण प्रवृत्ती कवितेत दाखवताना कवयित्री म्हणते,

*''दारातल्या चिंचेच्या फांद्या*
*शेजारच्या आंब्यात मिसळेपर्यंत*
*लंगडं पाखरू होऊन*
*घुटमळं अंगणात''*

6846

891.46

*Marathi Sahitya : Pravah,*
*Prakar ani Pratibimb*
*Editor : Dr. Satish Kamat*

- मराठी साहित्य : प्रवाह,
  प्रकार आणि प्रतिबिंब
  संपा. : डॉ. सतीश कामत

- © सर्व हक्क सुरक्षित

- प्रकाशक
  सुमती लांडे
  शब्दालय प्रकाशन,
  पोस्ट बॉक्स क्रमांक ९०, वॉर्ड ७,
  श्रीरामपूर - ४१३ ७०९
  दूरभाष: ०२४२२-२१०४२५
  भ्रमणध्वनी : ९८२२००८७९६,
  ९८२२५२५४४४

- प्रकाशन क्रमांक : ५८०
- प्रथम आवृत्ती : जानेवारी २०२२
- मुखपृष्ठ रचना : कृष्णा माळवे
- अक्षरजुळणी
  अक्षर कॉम्प्युटर, श्रीरामपूर
- मुद्रक
  स्मिता प्रिंटर्स, पुणे
- मूल्य : ४९० रुपये
- ISBN : 978-81-94459-39-2

**email-shabdalaya@gmail.com**
**www.shabdalaya.com** **www.facebook.com/shabdalaya**
**Bookganga, Flipkart, Amazon Kindle**

या वेबसाईटवर पुस्तके व ई-बुक्स ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध

* 'मराठी साहित्य : प्रवाह, प्रकार आणि प्रतिबिंब' या पुस्तकातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांचे असून त्याच्याशी संपादक, प्रकाशक, मुद्रक व वितरक सहमत व जबाबदार असतीलच असे नाही.

**कोरोना महामारीत जीव गमावलेल्या**
**प्रतिभावान लेखक - कलावंतांना**
**समर्पित ...**

पुस्तक काळजीपूर्वक हाताळणे

## ऋणनिर्देश


डॉ. धनाजी गुरव
डॉ. नीलकंठ शेरे
डॉ. नानासाहेब यादव
डॉ. राजेंद्र डोंगरदिवे
प्रा. जगदीश राणे
डॉ. गिरीश मोरे
डॉ. गोविंद काजरेकर
डॉ. बाळासाहेब लबडे
डॉ. राजाराम राठोड
डॉ. निवृत्ती कार्वेकर
डॉ. प्राजक्ता शित्रे
प्रा. राजरत्न दवणे
डॉ. अनील सकपाळ
डॉ. सूर्यकांत आजगावकर
डॉ. विनोद कुमरे
डॉ. भटू वाघ
डॉ. संजय नगरकर
डॉ. गोमटेश्वर पाटील
डॉ. भास्कर ढोके
डॉ. शरयू असोलकर
डॉ. सुभाष पाटील
डॉ. पांडुरंग गावडे
डॉ. विकास पाटील
प्रा. दौलत कांबळे


## अनुक्रम


प्रस्तावना ७

१. दलित साहित्य : संकल्पना, स्वरूप आणि परंपरा १५
डॉ. सतीश कामत

२. महानगरीय साहित्य : संकल्पना, स्वरूप आणि परंपरा ३८
डॉ. संजय नगरकर

३. स्त्रीवादी साहित्य : संकल्पना, स्वरूप आणि परंपरा ५४
डॉ. सुभाष पाटील

४. ग्रामीण साहित्य : संकल्पना, स्वरूप आणि परंपरा ७१
डॉ. पांडुरंग गावडे

५. उत्तर-आधुनिकता आणि मराठी कविता ८२
डॉ. गोविंद काजरेकर

६. उत्तर-आधुनिकता आणि मराठी नाटक ९१
प्रा. राजरत्न दवणे

७. कथा : एक साहित्यप्रकार १०१
डॉ. गोमटेश्वर पाटील

८. कादंबरी :एक साहित्यप्रकार १२२
डॉ. सतीश कामत

९. नाटक व एकांकिका या साहित्यप्रकारांचे स्वरूप व वाटचाल १३७
डॉ. निवृत्ती कार्वेकर

१०. कविता : एक साहित्यप्रकार १५०
डॉ. प्राजक्ता शित्रे

११. 'बकऱ्याची बॉडी' १६६
समकालीन वास्तवाला भिडणाऱ्या कथांचा संग्रह
डॉ. भास्कर ढोके

१२. 'मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट' १७५
वास्तव आणि कल्पकतेचे नेटके मिश्रण
डॉ. नानासाहेब यादव


पुस्तक काळजीपूर्वक हाताळावे

१३. 'तिचा अवकाश' १८४
ठसठसणाऱ्या व्यथा वेदनांची गाथा
डॉ. विकास पाटील
१४. 'फेसाटी' २०४
वंचित समूहाच्या जीवनसंघर्षाची कहाणी
डॉ. सूर्यकांत आजगावकर
१५. 'क्रमशः' २१४
महानगरीय जाणिवा विस्तारित करणारी कादंबरी
डॉ. बाळासाहेब लबडे
१६. 'पुरोगामी' २२७
परिवर्तनवादी चळवळीची वाटचाल अधोरेखित करणारी कादंबरी
डॉ. शरयू आसोलकर
१७. 'आमदार सौभाग्यवती' २३७
एक प्रगल्भ राजकीय नाटक
प्रा. दौलतराव कांबळे
१८. 'भाई तुम्ही कुठे आहात !' २४७
प्रस्थापित राजकारण आणि दलित चळवळीवर प्रकाश टाकणारे नाटक
डॉ. गिरीश मोरे
१९. 'सिंधू, सुधाकर, रम आणि इतर' २६९
आधुनिकीकरणाच्या उबंरठयातून उत्तर-आधुनिकतेचे संदर्भ देणारे नाटक
प्रा. राजरत्न दवणे
२०. आशय, विषयाची सखोलता मांडणाऱ्या २८४
'एकांकिका कालच्या-आजच्या'
डॉ. निवृत्ती कार्वेकर
२१. 'नवसंवेदन' २९७
उत्तर आधुनिक मराठी कविता
डॉ. राजाराम राठोड
२२. 'धग असतेच आसपास' ३१२
उद्ध्वस्त ग्रामजीवनाची काव्य कहाणी
प्रा. जगदीश राणे
• लेखकाचा परिचय ३२३

## प्रस्तावना

कविता, कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, नाटक अशा शब्दरूप कलाकृतींना आपण साहित्य म्हणतो. साहित्य हा मानवी समाजाच्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक उपक्रम असून समाज, संस्कृती आणि साहित्य यांचा अन्योन्य असा संबंध असतो. साहित्य हे कल्पनाप्रधान असले तरी त्याला वास्तवाचेही भक्कम अधिष्ठान लाभलेले असते. वास्तवातील घटना-प्रसंग यांची निवड, त्यांची पुनर्रचना आणि स्वानुभवाची भर घालून आविष्कृत केलेली वास्तव समांतर नवनिर्मिती म्हणजे साहित्य असे म्हणता येते. साहित्याचा जन्म सह-हित साधण्यासाठी, समाज हितासाठी झालेला असतो. म्हणजेच साहित्याची निर्मिती केवळ लेखकाचा हस्तिदंती मनोरा नसून ती विशिष्ट समाजात घडणारी संस्कृतिक घटना असते. म्हणूनच एक सामाजिक-सांस्कृतिक घटित या दृष्टीने त्याचे मूल्यमापन करावे लागते. साहित्य हे समाज परिवर्तनाचे माध्यम असून साहित्याचा आशय आणि आविष्कार समजून घेताना प्रामुख्याने ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे.

साहित्यात समाजाचे प्रतिबिंब पडलेले असते. साहित्याची निर्मिती एखाद्या पोकळीमध्ये होत नाही तर भावना, संवेदना, जाणीव, अनुभव अशा अनेक घटकांची एकत्रित गुंफण होऊन साहित्य आकाराला येते. संवेदनशील मनाच्या व्यक्ती अनुभवाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून बघतात. त्यांच्या मनात अनेकविध स्वरूपाचे हुंकार उमटत जातात. हेच हुंकार मग साहित्यरूप धारण करतात. साहित्याचे स्वरूप उलगडताना साहित्यविचार आणि समीक्षाव्यवहार महत्त्वाचा ठरतो. त्याचाच एक भाग म्हणून तत्त्वचर्चा आणि त्या त्या साहित्यकृतीच्या संदर्भातील विवेचन केले जाते. साहित्यकृतींचा विचार करताना अभ्यासकाला




- **डॉ. सतीश कामत**
  (संपादक)
- फोंडाघाट एज्युकेशन सोसायटी संचलित, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, फोंडाघाट (सिंधुदुर्ग) येथे सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख म्हणून कार्यरत.


- 'दलित ग्रामीण साहित्य : चिंतन आणि आस्वाद' (२०१३), 'दलित आत्मकथनांतील व्यक्तिरेखा' (२०१६), 'भाषांतर, रुपांतर आणि अनुवाद' (२०१७), 'अवकाळी पावसाच्या निमित्ताने', 'मालवणीतल्या वाटा' (२०१७), 'साहित्य : आशय आणि आविष्कार' (२०१८), 'साहित्यबंध' (२०१९), प्रबोधशिल्पी अण्णा भाऊ साठे' (२०२०), 'पेरियार ई. व्ही. रामास्वामी', 'समाज क्रांतीचे आद्य जनक : म.जोतीराव फुले' (संक्षिप्त चरित्रे), 'साहित्यसम्राट अण्णाभाऊ' (२०२१) हे महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध.
- कोकण मराठी साहित्य परिषदेचा श्री. प्रभाकर पाध्ये उत्कृष्ट समीक्षाग्रंथ पुरस्कार प्राप्त (२०१४)
- दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूरच्या वतीने विशेष पुरस्कार देऊन सन्मानित (२०१७)
- विविध वृत्तपत्रे व नियतकालिकांतून ललित व संशोधनपर लेख प्रसिद्ध.

१.

# दलित साहित्य : संकल्पना, स्वरूप आणि परंपरा


डॉ. सतीश कामत


## प्रास्ताविक

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षामुळे आणि त्यांच्या क्रांतिकारी विचारांच्या प्रभावामुळे भारतीय समाजात दलित, आदिवासी आणि भटक्या समाजाचे वैचारिक परिवर्तन होऊ लागले. परिणामी आजवर समाजव्यवस्थेने मुखी ठेवलेली ही माणसे बोलू लागली लिहू लागली. दलितांच्या या लेखनाला 'दलित साहित्य' असे संबोधले जाऊ लागले. १९६० नंतर दलित साहित्य विकास पावू लागले. या साहित्याने दलितांच्या व्यथा-वेदनेला आणि दुःखाला आवाज दिला. दलित जीवन शब्दबद्ध केले. नकार आणि विद्रोह हे विशेष दलित साहित्याने मराठी साहित्याला दिले.

'दलित' ही एक जाणीव आहे. शतकानुशतके ज्यांना यातना भोगाव्या लागल्या व्यवस्थेने ज्यांना मानवी हक्कापासून वंचित ठेवले, कष्टाला जुंपून ज्यांना कायमचे उपाशी ठेवले, ज्यांचे वर्चस्व हिरावून घेतले ते 'दलित'. दलित जीवन हेच दलित साहित्याच्या निर्मितीचे कारण असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानावर दलित साहित्य प्रवाह भक्कमपणे उभा आहे. दलित साहित्याची निर्मिती ही सामाजिक दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण घटना म्हणता येते.

## 'दलित' संकल्पनेचा अर्थ व स्वरूप

'दलित' या शब्दात सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक असा अर्थ अंतर्भूत आहे. सवर्णांच्या स्वार्थी आणि सत्तालोलूप वृत्तीतून या अमानवीय संकल्पनेचा जन्म झाला आहे. त्यांनी धर्म आणि वर्णजातीच्या बळावर येथील वर्णबाह्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माणसाच्या शरीर व मनाचे खच्चीकरण करून त्याला 'दलितत्त्व' बहाल केले. यादृष्टीने वर्णाधिष्ठित, विषम मूल्यावर

आधारित व्यवस्थेने ज्यांची पिळवणूक केली व ज्यांना सत्ताहीन, लाचार, ज्ञानदरिद्री, धनदरिद्री ठेवले अशा दीन दुबळ्यांना 'दलित' म्हणता येईल.

मराठीतील प्रसिद्ध शब्दकोशकार कृ. पां. कुलकर्णी, वि. वा. भिडे आणि रा. शं. वाळिंबे यांनी 'दलित' शब्दाचे अर्थ फोडलेले, कुटलेले, चिरडलेले, भरडलेले, तुडविलेले असे दिले आहेत. या अर्थावरून वंचितांचे, उपेक्षितांचे पारंपरिक व्यवस्थेने जाणिवपूर्वक शोषण केल्याचे लक्षात येते. इथे फोडणारा व फुटलेला, कुटणारा व कुटलेला, चिरडणारा व चिरडलेला, तुडवणारा व तुडवला गेलेला, दळणारा- दळला गेलेला ही दोन व्यक्तींची रूपे व क्रिया स्पष्टपणे लक्षात येतात. त्यामुळे हे 'दलितत्व' नैसर्गिक नाही, तर ते मानवनिर्मित आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींची व्याख्या या अर्थाशी साम्य दर्शविते. ''दलित हा मानवी प्रगतीत सर्वात मागे पडलेला आणि मागे रेटलेला सामाजिक वर्ग आहे.''[१] असे ते म्हणतात. यातील 'रेटलेला' या शब्दावरूनही रेटणारा व रेटला गेलेला ही शोषक व शोषित व्यवस्था प्रत्ययाला येते.

'दलित' ही संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न जवळपास पाच हजार वर्षापासून चालू आहे. ऋग्ववेदात 'दास' व 'दस्यू' या नावाचे आर्येत्तर व आर्याशी स्पर्धा करणारे मानवगट निर्दिष्ट केलेले आहेत.''[२] 'दास' व 'दस्यू' हे शब्द 'दलित' या संकल्पनेशी साम्य दर्शविणारे आहेत. शिवाय शूद्र, अतिशूद्र, चांडाळ, अत्यंज अस्पृश्य इत्यादी शब्द दलित शब्दाचेच पूर्वज''[३] असल्याचे सांगून माने यांनी प्राचीन काळातील दलित संकल्पनेची विविध शब्दरूपे स्पष्ट केली आहेत. या दोन्ही मतांचा परामर्श घेतल्यावर असे दिसते की, 'दलित' ही संकल्पना प्राचीन काळापासून भारतीय समाजव्यवस्थेच्या वर्ण जातीसमुहांची निर्देशक अशी संकल्पना आहे. दलितांच्या संबोधनार्थ वापरल्या गेलेल्या वरील संज्ञा आणि बहिष्कृत, निराश्रीत, वर्गिकृत, Depressed classes, शेड्यूल्ड कास्टस् या संज्ञा समान अर्थाच्याच वाचक व वाहक आहेत. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४१ व ३४२ (१) नुसार या जातीगटाच्या समुहांना अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती असे म्हटले आहे, म्हणजेच अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व आदिवासींचा समावेश 'दलित' या संकल्पनेत होतो. धर्मव्यवस्था व समाजव्यवस्थेने उपेक्षित, वंचित ठेवलेला 'दलित' अथवा 'दलित समाज' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गुन्हेगार, आदिवासी व अस्पृश्य जाती जमाती या तीन वर्गात विभागला आहे. त्याचा सविस्तर आणि सखोल विचार केला तर या जाती जमातींचाच 'दलित' या संकल्पनेत समावेश करणे योग्य ठरते. आजही हे



दलितपण कायम असून त्यामुळे दलित माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळालेली नाही. व्यवस्थेने त्याला जन्माने, धंद्याने जातीने तसेच रूढी परंपरेने बहिष्कृत, अस्पृश्य म्हणून दूर ठेवले, रानटी, भटके बनविले. इतकेच नव्हे तर गुन्हेगारही ठरविले. असा हा गावकुसाबाहेरचा व गावकुस नसलेला शोषित, पीडित माणूस अथवा मानवी समाज 'दलित' या संकल्पनेतच येतो.

'दलित' या शब्दाचा अन्वयार्थ लावताना डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात, ''दलित म्हणजे अशा व्यक्तींचा समूह ज्यांचा माणूस म्हणून जगण्याचा हक्क हिरावला गेला आहे. ज्यांच्या जन्माने, त्यांच्या वाट्याला या समाजरचनेत एकाच प्रकार जीवन आले आहे. माणूस म्हणून ज्यांचे मूल्य अव्हेरले गेले आहे, ज्यांना माणसासारखे मानाने जगणे नाकारले गेले आहे ते दलित.''[४] या व्याख्येत तळातील व्यक्ती व समाजावर व्यवस्थेने लादलेले अमानुष जीवन प्राधान्याने सूचित होते. प्रा. केशव मेश्राम यांनीही हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला त्यांना दलित म्हणावे''[५] असे प्रतिपादन करून पारंपरिक व्यवस्थेकडून होणारे शोषण अधोरेखित केले आहे.

डॉ. म. ना. वानखेडे यांनी, ''केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीय नव्हे, तर जे पिळले गेलेले श्रमजीवी आहेत ते सर्व दलित.''[६] असे व्यापक अर्थाने म्हटले आहे. तर डॉ. सदा कऱ्हाडे यांनी, ''आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या मिळून एक सर्वसमावेशक दलित वर्ग मानता येईल. त्यात कामगार, शेतमजूर, उपजीविकेसाठी श्रमणारे आणि अस्पृश्यही येतील.. ज्यांची पिळवणूक होते ते दलित.''[७] असे प्रतिपादन केले आहे. नामदेव ढसाळांच्या व्याख्येचा सूरही, दलित म्हणजे अनुसूचित जाती जमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी इत्यादी.''[८] असा आहे. वानखेडे , कऱ्हाडे व ढसाळ यांनी 'दलित' संकल्पनेत ज्यांचे ज्याचे शोषण होते त्या कामगार, कष्टकरी श्रमिकांचाही समावेश केल्याचे दिसते. या मताचे खडन करताना राजा ढाले म्हणतात, ''केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीयच नव्हे तर जे जे पिळले गेलेले असे श्रमजीवी आहेत ते सर्व दलित मानण्यामुळे अन्याय होतो.''[९] या मतांचा स्वीकार केला तर अन्याय करणारा व अन्याय सहन करणारा यांना एकाच तराजुने तोलल्यासारखे होईल.

थोडक्यात 'दलित' शब्दाची व्याख्या फार जटिल न करता, हिंदू धर्माने आणि सामाजिक रूढीने ज्यांना आजवर बहिष्कृत मानले व ज्यांना सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीयदृष्ट्या मागास ठेवले गेले

अशा अस्पृश्य, गुन्हेगार, भटक्या व आदिवासी जाती जमातीच्या माणसाला 'दलित' म्हणता येईल. यालाच अनार्य, अवर्ण अथवा वर्णबाह्य अस्पृश्य असे देखील म्हटले जाते. अशा अस्पृश्य वा दलित माणसाचे चित्रण दलित साहित्यात आले आहे. हे चित्रण दलित माणसाच्या जीवनाचे आहे म्हणून किंवा दलित लेखकांनी केले आहे म्हणून ते असाधारण आहे असे नव्हे, तर त्यातून व्यक्त झालेल्या जाणिवांमुळे ते अद्वितीय ठरले आहे. दलित साहित्यातून व्यक्त झालेल्या या जाणीवांचा शोध घेतल्यास दलित साहित्याचे वेगळेपण स्पष्टपणे प्रत्ययाला येईल. म्हणूनच प्रस्तुत ठिकाणी दलित जाणीव म्हणजे काय हे स्पष्ट होणे आवश्यक वाटते.

**दलित माणसाची 'दलित जाणीव'**

दलित माणूस हा दलित जीवनाचा केंद्रबिंदू आहे. तो संपूर्ण दलित समाजाचा प्रतिनिधी आहे. दलित साहित्यातून व्यक्तीला समरूप असलेल्या संपूर्ण दलित जीवनाचे, दलित वास्तवाचे वस्तुनिष्ठ प्रकटीकरण होते. 'दलित जाणीव' ही व्यक्तिकेंद्री व समाजकेंद्री अशा दोन्ही पातळ्यांवर आविष्कृत होऊ शकणारी जाणीव आहे. ही नवी जाणीव आणि जीवनदृष्टी यामुळे दलित साहित्याला वेगळेपणा प्राप्त झालेला आहे.

'उत्थानगुंफा' या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत बाबुराव बागूल म्हणतात, ''नकार, विद्रोह, मानव मध्यमावर्तित्व, अनात्मवाद, अनीश्वरवाद, गतीवाद, ज्ञानविज्ञान आणि त्याच्या योग्य उपयोगासाठी सत्ता, अर्थसत्ता दलितांच्या हातात असणे ही सम्यक क्रांतीची सूत्रे आहेत. हीच 'दलित जाणीव' होय.''[१०] कालबाह्य परंपरामूल्यांना, व्यवस्थेला नाकारणारी आणि भौतिकवाद, इहनिष्ठा स्वीकारणारी अशी जाणीव इथे बागुलांना अपेक्षित आहे. दया पवारांचा विचारही असाच आहे. ''मध्यमवर्गीय समाजाने स्वीकारलेल्या जाणिवेला छेद देणारी, तळागाळातील माणसांबद्दल आपुलकी बाळगणारी वरील कप्पेबंद व्यवस्थेला नकार देऊ इच्छिणारी जी क्रांतिकारी जाणीव तीच दलित जाणीव''[११] असे ते म्हणतात. या विचारात अन्यायाविरुद्ध झुंज देणाऱ्या प्रवृत्तीला महत्त्व असल्याचे स्पष्ट होते.

प्रा. म. भि. चिटणीस यांनी दलित जाणीव वेगळे परिमाण व धार देते असे सांगून ''त्याचा आत्माविष्कार व्यक्तिनिष्ठता न हरपला समाजनिष्ठ होतो.''[१२] असे नमूद केले आहे. म्हणजेच प्रस्थापित समाजव्यवस्थेसंबंधीचा दलित व्यक्तीचा क्षोभ एका त्या व्यक्तीचाच न राहता सर्वहारा, वंचित परंतु जागे झालेल्या व न्याय मागणाऱ्या एका मोठ्या गटाचा क्षोभ असे प्रातिनिधिक रूप त्याला प्राप्त होते.



याच अनुषंगाने शरचंद्र मुक्तिबोध यांनी दलित जाणिवेसंबंधीचे विचार स्पष्ट केले आहेत. ते म्हणतात, ''दलित जाणीव ही आधुनिक भारतातील दलित वर्गाच्या जीवन व्यापारामधून उद्भवलेली जाणीव होय. भारतीय समाजेतिहासाचा विशेष असा की येथे वर्गव्यवस्था जातिव्यवस्थेच्या रूपाने स्थिर झाली आणि त्यातल्या त्यात दलितवर्गाचा विशेष असा की आर्थिक शोषणाबरोबर अस्पृश्यपणाचा शाप मिळून या वर्गाच्या माणूसपणालाच लांछित व्हावे लागले. त्यामुळे ऐतिहासिक वेदनेविरुद्ध प्रक्षोभ हा दलित जाणिवेतील एक महत्त्वाचा धागा आहे.''[१३] यावरून मानव मूल्याधिष्ठित असणारी ही दलित जाणीव दलित माणसाच्या अनुभवांशीच संबंधीत असल्याचे लक्षात येते. नरहर कुरुंदकरांनी ''जे आहे ते उलथून टाकण्याची जिद्द धरणारे मन, मूल्यांची कोणती तरी कल्पना मनाशी धरणारे, नव्या जगाचे कोणते तरी स्वप्न पहाणारे मन असते.''[१४] त्याला दलित जाणीव संबोधले आहे तर प्रा. यशवंत मनोहर यांनी, ''विद्रोह, मानवमध्यवर्तीत्व, अनात्मवाद, अनिश्वरवाद, गतिवाद, ज्ञानविज्ञान निष्ठा हा सर्व ऐहिक, भौतिक बुद्धिवादी असलेला सम्यक विचार हीच दलित जाणीव होय.''[१५] असे म्हटले आहे. या जाणिवेत त्यांना अन्याय करणाऱ्या सर्वच संस्थाविरुद्ध विद्रोह अपेक्षित आहे.

सारांशरूपाने, दलित जाणीव ही दलित जीवनाबद्दलचा दृष्टिकोन असतो. हा दृष्टिकोन माणसाचे अवमूल्यन करणाऱ्या सर्व मूल्याविरुद्ध विद्रोह पुकारणारा व समाज परिवर्तनाच्या मूल्यात्म प्रेरणेशी इमान राखणारा असला पाहिजे. दलित जाणिवेचे केंद्र 'माणूस' आहे, ही जाणीव बंधमुक्त माणसाचा विचार मांडते. गुलामी आणि दास्याची व्यवस्था गाडण्याच्या, परतंत्रतेचे जोखड फेकून देण्याच्या मानसिक प्रेरणेतून या जाणिवेचा जन्म झाल्याने, स्वातंत्र्याची अपेक्षा ही दलित जाणिवेमागची मूलभूत प्रेरणा ठरते. एका व्यक्तीच्या माध्यमातून जरी ही जाणीव व्यक्त झाली तरी त्या व्यक्तिपूर्तीच ती मर्यादित न राहता संपूर्ण समाजाला कवेत घेते. शोषणविषयक जाणीव व शोषणाच्या निर्मूलनासाठी लढा ही या जाणिवेची दोन रूपे आहेत. अशी दलित जाणीव दलित साहित्याचा मूलाधार आहे .

**'दलित साहित्य' काही व्याख्या**

'दलित' या शब्दामध्ये अस्पृश्य जातीचा संदर्भ अभिषेत आहे. महर्षी वि. रा. शिंदे यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' या ग्रंथात 'डिप्रेस्ड क्लासेस' याकरिता 'दलित' हा शब्द वापरून त्यामध्ये महार, मांग, परिया नामक शूद्र जातींचा उल्लेख केला आहे. पुढे या शब्दासाठी मराठीत 'बहिष्कृत समाज' हा शब्द वापरात आला. डॉ. आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्राचे ठेवलेले व आपल्या

पहिल्या संघटनेचे 'बहिष्कृती हितकारिणी सभा' (१९२४ ) हे नाव यादृष्टीने बोलके आहे. म्हणजेच बहिष्कृत वर्ग, शेड्युल्ड कास्ट, अनुसूचित जाती किंवा 'दलित' हे सर्व शब्द समानअर्थी असून त्यातून 'अस्पृश्य जाती' चाच बोध होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबईत इ. स. १९४६ च्या सुमारास 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना केली आणि तिच्यामार्फत 'सिद्धार्थ कॉलेज' सुरू केले. सिद्धार्थ कॉलेजमधून बाहेर पडलेल्या पहिल्या पिढीने इ. स. १९५० साली 'सिद्धार्थ साहित्य संघ' ही वाङ्मयीन संस्था स्थापन केली. पुढे यातूनच १९ जुलै १९५३ ला 'महाराष्ट्र दलित साहित्य संघ' नावाची संस्था स्थापन करण्यात आली. यानंतर १२ सप्टेंबर १९५३ च्या जनता' साप्ताहिकात 'दलित साहित्याचे समालोचन' हा आ. श्री. रणपिसे यांचा लेख मिळतो. म्हणजेच इ. स. १९५३ ला 'दलित साहित्य' हा शब्दप्रयोग वापरला गेला. यानंतर 'दलित साहित्य' हे नामाभिधान वापरून काही लेख प्रकाशित केले गेले आहेत. इ. स. १९५१ साली अण्णाभाऊ साठे यांनी 'वारणेच्या खोऱ्यात' या आपल्या कादंबरीच्या अर्पणपत्रिकेत 'दलित साहित्य' हा शब्द वापरलेला दिसतो. पुढे 'दलित साहित्य' हाच शब्द रूढ झाला.

दलितांना व्यवस्थेने आर्थिक आणि सामाजिक अशा दोन्ही पातळ्यांवरील स्वातंत्र्य नाकारले. माणसाला माणूस म्हणून हवी असणारी प्रतिष्ठाच हिरावून घेतली गेली. म्हणून अस्पृश्य दलितांचे जीवन हा दलित साहित्याचा एक प्रमुख चित्रणविषय ठरला. भारतातील सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात ज्यांच्या वाट्याला वंचित, उपेक्षित, अवमानित आणि अन्याय जुलुमांचे जगणे आले आहे. त्या जाती, वर्ग, गट या सर्वांतील लोकांना 'दलित' म्हणता येईल आणि त्यांच्या जीवनाचे चित्रण करणाऱ्या साहित्याला 'दलित साहित्य' म्हणता येईल. दलित साहित्यामध्ये माणसाला त्यांच्या जन्मामुळे वाट्याला येणाऱ्या यातनांचे चित्रण येते. स्थूलमानाने या प्रवृत्तीच्या साहित्यात व्यक्त होणारे दुःख हे प्रामुख्याने पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांचे दुःख आहे. या दुःखाच्या मुळाशी शोषणाधिष्ठित समाजरचना आहे. आज 'दलित साहित्य' या नावाने जे साहित्य ओळखले जाते, अशा या 'दलित साहित्य' संज्ञेसंदर्भात वेगवेगळ्या विचारवंतांनी मांडलेल्या मतांचा, व्याख्यांचा थोडक्यात आढावा घेता येईल.

- पु. ल. देशपांडे - ''दलित वाङ्मयाने मराठी साहित्यात प्रथम जर काही आणले असेल तर संतापातून चमकणारे अश्रू अन्यायाविरुद्ध उठताना संतापातून फुटणाऱ्या अश्रूंचे मोल हे सर्वात मोठे असते. सामान्यांच्या



भाषेत हा तळतळाट असतो. ह्याच तळतळाटाचे एक उदात्त स्वरूप म्हणजे दलित साहित्य.''

- डॉ. म. ना. वानखेडे - ''दलित साहित्य म्हणजे दलित लेखकांनी दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य.''
- प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख - ''दलित जीवनाचे दर्शन देणारे, दलितांच्या विचार भावना प्रकटवणारे दलितांनीच लिहिलेले साहित्य ते दलित साहित्य.
- बाबुराव बागुल - ''माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश, वर्ण आणि जातिश्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य''
- प्रा. केशव मेश्राम - ''हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृश्यांना दलित म्हटले पाहिजे व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्यास दलि साहित्य म्हणावे''
- प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध - ''दलित असणे व दलित जाणीव असणे हे भिन्न आहे. दलित जाणिवेतून दलित जीवनविषयक जे वाङ्मय निर्माण होते ते दलित वाङ्मय.''
- प्र. श्री. नेरुरकर - ''दलित समाजात जन्माला आलेल्या व दलित वर्गांची पिळवणूक, त्यांचा विविध स्तरावर पाशवी छळ व त्यांचे माणुसकीला मुकलेले जीवन, यांचा प्रत्यक्ष व जिवंत अनुभव घेणाऱ्या दलित वर्गातील साहित्यिकांनी मराठीत पहिलावहिला केलेला प्रक्षोभक, विद्रोही व सर्जनपुष्ट आविष्कार म्हणजे दलित साहित्य होय.''
- प्रा. म. भि. चिटणीस - ''दलित वर्ग हा भारताचा एक पुराण, मूक आणि अदृश्य पुरुष होता आणि त्याचा अनुभव आज वाङ्मयरूप घेत आहे. हा सगळा संदर्भ 'दलित' शब्दाला द्यावा लागेल.''
- डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये - ''यंत्रकुशल युगातही मनूप्रणित सनातनी समाजव्यवस्थेचा जाच असह्य होत असून दलित समाजाची अस्मिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जागृत केल्यामुळे दलितांत प्रखर विद्रोही वृत्ती निर्माण होत आहे. चीड, संताप, बंडखोरी ही या प्रवृत्तीची काही लक्षणे या वृत्तीचा कलात्मक, अकलात्मक आविष्कार म्हणजे आजचे 'दलित साहित्य' होय.''
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - ''दलितांची समस्या म्हणजे मानवी स्वातंत्र्याची समस्या होय. दलितांच्या समस्येचा प्रत्यय आल्याशिवाय मानवी

स्वातंत्र्याच्या समस्येचा अर्थ समजणार नाही. असा हा व्यापक प्रत्यय ज्या साहित्याच्या मुळाशी असतो ते साहित्य दलित साहित्य जसे असते तसे ते मानवाचेही साहित्य असते.''

- प्रा. गंगाधर पानतावणे - ''दलित साहित्याची चळवळ हा एक मुक्तिसंग्राम आहे. स्वतःला शोधण्याचा तो एक प्रभावी प्रयत्न आहे. मराठी वाङ्मयात असे चित्र कोणीही रेखाटले नाही. हे चित्र रेखाटण्याची धडपड म्हणजे दलित साहित्य.''
- श्री. दि. के. बेडेकर - ''माझा समाज आजवर दलित होता, त्याला आता प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. ही प्रवृत्ती या साहित्यात दिसते. दलित जीवनाचे वास्तव लढाऊ समाजपरिवर्तनाची व माणुसकीची जिद्द, तिचा उद्गार व आविष्कार म्हणजे दलित साहित्य.''
- प्रा. दत्ता भगत म्हणतात- ''आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवनविषयक दृष्टिकोनाधारे स्वतःला आणि स्वतः भोवतीच्या वास्तवाला जाणून घेण्याच्या उत्कट इच्छाशक्तीचा शब्दरूप आविष्कार म्हणजे दलित साहित्य''

वरील व्याख्या 'दलित' या माणसाला केंद्रवर्ती ठेवून केलेल्या व्याख्या आहेत. दलित लेखकांनी दलित जाणिवेतून निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य ते दलित साहित्य होय. दलित साहित्याच्या नावापासून त्याच्या व्याख्येपर्यंतची ही मते दलित साहित्याचे स्वरूप समजून घेताना उपयोगी पडतात.

**दलित साहित्याचे स्वरूप**

वर्षानुवर्षे या देशात वंश, वर्ण आणि जातींच्या आधारावर समाजात माणसामाणसात श्रेष्ठ कनिष्ठत्वाची भावना रुजविली गेली. दास्य, गुलामीनी जनावराच्या जिण्याची एक मानसिक बेडी परंपरेने कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या लोकांच्या पायात अडकविली गेली. समता आणि स्वातंत्र्याचा त्यांचा हक्क नाकारला गेला. पण वर्षानुवर्षे दबला गेलेला हा आवाज, शिक्षण आणि संवेदनशील मन यांचा आधार मिळताच उफाळून आले. पूर्वपरंपरेवर कडाडून टिका, विद्रोहाची भाषा, मुक्त भावनांचा उद्रेक त्यांच्या लेखनातून जाणवू लागला. प्रस्थापितांचे आलेले कडवट अनुभव, त्याबद्दलचे दाहक लेखन या साहित्याचा केंद्रबिंदू ठरले. हे मानसिक परिवर्तन आगळ्यावेगळ्या रूपाने साहित्यात उभे राहिले. शतकानुशतके प्रगतीची दारे बंद होती. जीवनात पूर्णपणे उपेक्षाच वाट्याला आली. जातीच्या नावाखाली आर्थिक विषमता आणि जीवनाच्या इतर अंगांनीही



पूर्णपणे शोषणच वाट्याला आले. अशा या पूर्णपणे उपेक्षित घटकांची, त्यांच्या जगण्यामरण्याचीही दखल मराठी साहित्यात कोठेही घेतलेली दिसत नाही. संत साहित्यात थोड्याफार प्रमाणात जातीपातींची बंधने व उच्चनिचता मानू नये, याबाबतचा क्षीण आवाज उठलेला दिसतो. पण इतरत्र मात्र फारशी दखल घेतली गेली नाही. 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' केशवसुतांनी विचारलेला दिसतो किंवा 'उपेक्षितांचे अंतरंग' श्री. म. माठयांनी चित्रित केले, असे फारच थोडे लेखक मराठी साहित्यात आहेत. त्यामुळे मराठी साहित्यातले जीवनानुभव हे ठराविक वर्गाचे; त्यामुळे ठराविक साच्याचे होते. पांढरपेशे लोक, त्यांचे मध्यमवर्गीय जीवन आणि त्यांचे त्याच त्याच प्रकारचे विशिष्ट जीवनानुभव मराठी साहित्यात सातत्याने येत राहिले. महाराष्ट्राच्या शहरी संस्कृतीपासून खेड्यापाड्यातील कानाकोपऱ्यातून हजारो दुबळे उपेक्षित लोक दारिद्र्याचे नि अवहेलनेचे जिणे जगत आहेत याची साधी जाणीवसुद्धा मराठी साहित्याला नव्हती. गावापासून दूर जगणारा हा समाज, त्यांचे आचार, विचार नि संस्कृती यात गावातल्या जिण्यापेक्षा प्रचंड तफावत होती. कनिष्ठत्वाच्या जात्यात भरडल्या जाणाऱ्या या लोकांचा स्पर्शही उच्चवर्णीयांना निषिद्ध होता. अशा वेळी साहित्याच्या प्रक्रियेत त्यांना स्थान कुठून मिळणार? अस्पृश्यता हा ईश्वरी दंडक आहे, हा विचार वर्षानुवर्षे त्यांच्या मनावर बिंबवला गेला आणि जवळ जवळ ७०० वर्षे अज्ञानाच्या, अशिक्षितपणाच्या गर्तेत खितपत पडलेल्या दलित वर्गाच्या तीव्र आणि दाहक अनुभवातून आणि जाणिवेतूनच दलित वाङ्मयाची निर्मिती झाली.

डॉ. आंबेडकरांच्या सुधारणावादी चळवळीने दलित समाज जागृत झाला आणि सामाजिक बदलाची अपेक्षा करू लागला. त्याचबरोबर मूलभूत हक्कांची जाणीवजागृती झाल्याने आपल्या वाङ्मयातून आत्माविष्कार व आत्मविकसनाची जिद्द बाळगून वाटचाल करू लागला. दलितवर्गाचे मानसिक परिवर्तन घडू लागले आणि साहित्यातून त्याचे प्रतिबिंब उमटू लागले. दलित साहित्य माणसाला केंद्रबिंदू मानते. त्याच्या सुखदुःखाशी समरस होते. समाजाला समतेची शिकवण देते. दलित साहित्य माणसामाणसात वैरभाव न पसरविता ते माणसामाणसात प्रेम पसरविते. दलित साहित्य मानवाच्या मुक्तीचा पुरस्कार करते. ते माणसाला महान मानते. वंश, वर्ण आणि जाती श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करते. 'दलित साहित्य' हे 'दलित' असण्याच्या जाणिवेतून निर्माण झालेले असते. म्हणून दलित साहित्याची संकल्पना समजावून घेताना 'दलित' व 'दलितत्त्व' म्हणजे काय? ते जाणून घेता येईल.

## दलित साहित्याच्या प्रेरणा

दलित चळवळ आणि दलित साहित्य गौतमबुद्ध , महात्मा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती आदरभाव व्यक्त करते. कारण शोषणाधिष्ठित व्यवस्थेविरुद्ध विद्रोह पुकारण्याचे युगप्रवर्तक कार्य या महापुरुषांनी केले आहे. माणसाला महान मानणारी त्यांची विचारधारा आहे. शोषण व्यवस्थेवर प्रहार करण्याचे कार्य त्यांच्याच चळवळीने केले आहे. सम्यक् क्रांतीचा विचार यांनीच समाजासमोर मांडला. भ. बुद्धाने 'माणूस' केंद्रभूत मानून जातिभेद व अस्पृश्यता या सामाजिक विषमतेचा धिक्कार केला. बुद्धाचे तत्त्वज्ञान, समता, स्वातंत्र्य, न्याय आणि नीतिमत्ता या सामाजिक मूल्यांवर उभे आहे. दलित साहित्यही हीच मूल्ये मानते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पुनः प्रवर्तन केलेल्या बौद्धधर्माचा दलित समाजाने स्वीकार केला आहे. म्हणून बुद्ध व बुद्धाचे तत्त्वज्ञान ही दलित साहित्याची प्रेरणा ठरते.

विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नितीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले असा बुद्धी प्रामाण्यवादी व दूर दृष्टीचा महापुरुष म्हणजे म. जोतिबा फुले होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फुलेंना गुरुस्थानी मानले आहे. आंबेडकरपूर्व व आंबेडकरकालीन समाजाने फुले यांच्यापासून प्रेरणा घेतलेली दिसते. या प्रेरणेतून उदयाला आलेले बाबा वलंगकर, शिवराम जा. कांबळे, कवी पंडित कोंडिराम, किसन फागू बंदसोडे इत्यादींची नावे घेता येतील.

भगवान बुद्ध , महात्मा जोतिराव फुले यांच्या कार्यातून दलित जीवनाला व साहित्याला प्रेरणा मिळालेली असली तरी दलित साहित्याच्या प्रेरणेचे प्रत्यक्ष रूप म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारकार्य होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने अंध:कारमय दलित जीवनात 'क्रांतिसूर्य' प्रकट झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवाचे माणूसपण नाकारणाऱ्या हिंदूधर्म, रूढीपरंपरा, चातुर्वर्ण्य समाजरचना, जातिभेद, अस्पृश्यता या विषमता पेरणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले. त्यांनी दिलेल्या दलित मुक्तीच्या लढ्यातून प्रेरणा घेऊन दलित साहित्य जन्माला आले. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे जनक ठरले. तर दुसऱ्या बाजूने ते पहिले विद्रोही लेखक ठरले आणि दलित साहित्याचे महत्त्वाचे प्रेरणास्रोत बनले.

थोडक्यात समतेचा धडा देणारे, व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार, अस्पृश्यतेविरोधी व जातियतेविरोधी विचार व कृतीनिष्ठ हल्ले यातून दलित साहित्याला प्रेरणा देणारे



भ. बुध्द, म. जोतिराव फुले यांची पार्श्वभूमी दलित साहित्याला आहेच. पण ज्यांच्या विचार, वाणी आणि कृतीने दलित समाजाला जीवनविषयक नवी दृष्टी प्राप्त झाली, आत्मसन्मानाचे व आत्मशोधाचे भान आले, 'माणूस' म्हणून माणसाचे मूल्य प्राप्त झाले, विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेला हादरा दिला ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित साहित्याच्या मुख्य प्रेरणास्थानी आहेत. किंबहुना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास हाच मुळी दलित साहित्याचा प्रेरणास्रोत आहे.

## दलित साहित्याची वैशिष्ट्ये

### १. वेदना

विषमताधिष्ठीत भारतीय समाजव्यवस्थेने दलित माणसाला 'माणूस' म्हणून वागविले नाही. शतकानुशतके त्यांचे शोषण करून त्यांना पशुपेक्षाही हीन वागणूक दिली. शोषणाधिष्ठित चातुर्वर्ण्यव्यवस्था स्वत:ला श्रेष्ठ समजणाऱ्या उच्चभ्रूंनी निर्माण केली आणि या व्यवस्थेने दलितांना गावकुसाबाहेरील बहिष्कृत जिणे जगायला भाग पाडले. प्रस्थापित व्यवस्थेने दीन दलितांना ज्ञान, प्रतिष्ठा, अस्मिता इत्यादी सारेच नाकारले. त्यामुळे दलित साहित्याने समाजपरिवर्तनासाठी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध लढा देऊन मानवमुक्तीचा पुरस्कार केला. धर्माधिष्ठित परंपरागत व्यवस्थेने आपले माणूसपण नाकारले याची वेदना दलित साहित्यातून व्यक्त झाली आहे. उदा. दया पवार यांच्या कवितेत व्यक्त झालेला दुःखाचा, वेदनेचा स्वर पाहता येईल.

"दुःखाने गदगदताना हे झाड मी पाहिलेले
तशी याची मुळे खोलवर बोधिवृक्षासारखी
बोधिवृक्षाला फुले तरी आली
हे झाड साऱ्या ऋतूत कोळपून गेलेले
धमनीधमनीत फुटू पाहणाऱ्या यातना
दुःखाने गदगदताना हे झाड मी पाहिले."

आपल्याला माणूस म्हणून वागणूक मिळत नाही ही दलितांची व्यथा शंकरराव खरातांच्या 'दौडी', 'सांगावा' या कथांतूनही पाहावयास मिळते. दलित आत्मकथने ही तर दुःखाच्या अभंगगाथाच आहेत.

### २. विद्रोह

भारतीय चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्थेविरुद्ध दलित साहित्याने विद्रोही भूमिका स्वीकारलेली आहे. दलिताच्या जीवनाशी द्रोह केला गेला आणि तो

हाणून पाडण्यासाठी विद्रोहाचा जन्म झाला. आर्जव, विनंत्या आणि सत्याग्रह करूनही दलितबांधवांना समानतेचा हक्क मिळाला नाही. अशा वेळी आक्रमक झाल्याशिवाय पर्याय राहात नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन संघर्षाचा आणि प्रखर विचारांचा परामर्श त्यांनी प्रस्थापित व्यवस्थेला दिलेला नकार व त्यासाठी घेतलेली विद्रोही भूमिका यांचा प्रत्यय येतो. अस्पृश्य समाज शतकानुशतके नम्र व लाचार बनून राहिला. तरी व्यवस्थेला पाझर फुटला नाही. शेवटी ठोठावल्याशिवाय दरवाजे उघडत नाहीत आणि हिसकावून घेतल्याशिवाय माणुसकीचे साधे हक्कही प्राप्त होत नाहीत, या धारणेतून विद्रोहाचा जन्म झाला. दलित साहित्यातील विद्रोह मानवनिर्मित व्यवस्थेने मला गावकुसाबाहेर का ठेवले? स्वातंत्र्यानंतरही या देशाने मला काय दिले ? अशा असंख्य प्रश्नांविरुद्ध व्यक्त होतो. धर्म,. संस्कृती आणि ढोगीवृत्ती यांना नकार आणि याविरुद्ध विद्रोह दलित कवींच्या कवितेतून व्यक्त झालेला दिसतो. प्रा. अरुण कांबळे लिहितात,

*''आज आम्ही गद्दार झालोय*
*तुमच्या संस्कृतीशी, ढोगी मानवतेशी*
*आणि वांझ धर्माशी सुद्धा*
*समुद्र खवळलाय.*
*आमच्या मुक्तीच्या घोषणांचे हिल्लोळ*
*देतील धडकी तुमच्या ढोंगी संस्कृतीवर*
*आणि करतील प्रक्रिया सर्वांवर*
*समुद्राच्या समानतेची*
*आज आम्हाला प्रकाशाची शीड उभारलेलं*
*स्वातंत्र्याचं गाव दिसतंय''*

अशाप्रकारे दया पवार, यशवंत मनोहर इत्यादी कवींनी विद्रोहाची धार गतिमान केलेली दिसते. दलित साहित्यातील विद्रोहाचा आविष्कार काही वेळा आजच्या शिक्षित दलित तरुणांना कराव्या लागणाऱ्या दोन पातळीवरील संघर्षातूनही प्रकट होतो. एका बाजूने त्यांना स्वजनांशी संघर्ष करावा लागतो तर दुसऱ्या बाजूने प्रस्थापित समाजाशी संघर्ष करावा लागतो. म्हणून येथील विद्रोहाचे स्वरूप वेगळे ठरते. उदा. असा संघर्ष शरणकुमार लिंबाळे यांच्या 'अक्करमाशी' या आत्मकथेतही, माधव कोंडविलकर यांच्या 'चिंध्या' या कथेत पाहावयास मिळतो.

थोडक्यात दलित साहित्यातून व्यक्त होणारा विद्रोह हा मुख्यतः धर्म, रूढी,



परंपरा, संस्कृती इत्यादींना पवित्र व श्रेष्ठ मानून त्याआधारे दलितांना वर्षानुवर्षे गुलाम ठेवू पाहाणाऱ्या व्यवस्थेविषयी येतो. हा विद्रोह या व्यवस्थेवर आघात करतो. येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, दलित साहित्यातील विद्रोह विशिष्ट व्यक्तीविरुद्ध विशिष्ट जमातीविरुद्ध नाही तर तो व्यवस्थेविरुद्ध आहे.

**३. नकार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, अस्पृश्यता हा दलितवर्गाच्या देहावरील कलंक आहे आणि तो वेळ पडली तर दलितवर्गाने आपल्या रक्ताने आपणच पुसून काढला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या विचाराच्या मुळाशी दलितवर्गामध्ये आत्मभान निर्माण झाले पाहिजे आणि आत्मसन्मानाच्या मार्गात ज्या ज्या गोष्टी अडसर ठरतात त्या सर्वांना नकार दिला पाहिजे हा भाव आहे. म्हणजेच दलित साहित्याने या देशातील धर्माधिष्ठित रूढी, परंपरा आणि यांच्या प्रभावाखाली असलेल्या सामाजिक व्यवस्थेला नकार दिला पाहिजे. नवयुगाची स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यासाठीच दलित लेखक विषम व्यवस्थेला नाकारतो. यातूनच दलित साहित्य मानवनिर्मित परंपरेने लादलेली जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, धर्मसत्ता, रूढी परंपरा, गुलामगिरी, शोषण इत्यादींना नाकारण्याच्या आड जे जे येते त्या सर्वांना नकार देण्याची भूमिका घेते. समाजात खोलवर रुजलेली विषमाधिष्ठित, अन्यायकारक प्रस्थापित व्यवस्था नाकारणे, हे कोणत्याही विद्रोही चळवळीचे सूत्र असते.

**४. आत्मभान**

दलित साहित्य ते चळवळीचे साहित्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलितोद्धाराच्या चळवळीतून दलित साहित्याची चळवळ उभी राहिली आहे. दलित चळवळीचा मुख्य उद्देश माणसाला 'माणूस' म्हणून प्रतिष्ठा प्राप्त करून देणे हा आहे. धर्माचे अधिष्ठान लाभलेल्या इथल्या सनातनी व्यवस्थेने वर्षानुवर्षे शूद्रातिशूद्रांना गुलामीत लोटून माणूसपणच नाकारले होते. अशा समाजाला आत्मसन्मानाने जगण्याची वाट डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या चळवळीने दाखविली. 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' डॉ. आंबेडकरांचा संदेश शिरोधार्य मानून संस्कारित झालेल्या दलित तरुणांना आपल्या अस्तित्वासंदर्भात त्यांना प्रश्न पडू लागले. आपला आत्मशोध घ्यावासा वाटू लागला. पदोपदी अवहेलना सोसलेल्या दलितांना आत्मसन्मानाची जाणीव महत्त्वाची वाटू लागली. आत्मसन्मान प्राप्त झाला तर दारिद्र्य संपवण्याचे मार्गही खुले होतील, याचे भान आले. हेच आत्मभान दलित साहित्यातून प्रकर्षाने व्यक्त होते. दलित चळवळीचा मुख्य

उद्देश तळागाळातील दलित माणसाला 'माणूस' म्हणून प्रतिष्ठा देणे हाच आहे.

**५. विज्ञाननिष्ठा**

दलित साहित्य चळवळ 'धर्म' या संकल्पनेकडे बुद्धिनिष्ठ दृष्टीने पाहाते. ईश्वरकल्पनेला नकार देते. व्यक्तिनिरपेक्ष वस्तुनिष्ठ वैज्ञानिक दृष्टीचा अवलंब करते. आंबेडकरवाद हा मानवी मूल्यांवर आधारलेला मानवतावाद आहे. तो भक्कम अशा बुद्धिवादावर उभा आहे आणि बुद्ध तत्त्वज्ञानाची त्याची मूळ बैठक असल्याने विज्ञान हे त्याचे एक अंग आहे. भगवान बुद्धाप्रमाणे आंबेडकरवादानेही ईश्वर, आत्मा इत्यादी संकल्पनांना नाकारले. त्यांनी देवधर्माला, धर्मशास्त्राला आणि त्याच्या कर्मविपाकी सिद्धान्ताला नाकारले आहे. प्रा. रावसाहेब कसबेंच्या शब्दात सांगायचे तर, प्रज्ञा, शील, करुणा व मैत्रीची सांगड म्हणजे आंबेडकरवाद. अनित्य, अनात्म, अनिश्वरवाद आणि विज्ञानवाद म्हणजे आंबेडकरवाद. बुद्धिप्रामाण्य, विवेक, गती, तर्क आणि बुद्धिवादाचा स्वीकार म्हणजे आंबेडकरवाद. त्यामुळे आंबेडकरी प्रेरणेतून स्फुरलेल्या दलित साहित्याचा विज्ञाननिष्ठा हा एक महत्त्वाचा गुणधर्म आहे.

**६. समूहमनाचा आविष्कार**

कोणतीही कलाकृती ही एका व्यक्तीची निर्मिती असते. साहजिकच कलाकृतीतून व्यक्त होणारा अनुभव हा व्यक्तिनिष्ठ अनुभव असतो. दलित साहित्यात मात्र निर्मितीच्या पातळीवर एका व्यक्तीची असणारी अनुभूती एकाचवेळी व्यक्तिनिष्ठही असते व समाजनिष्ठही असते. कारण सर्वच दलितसमाज विषमाधिष्ठित, अन्यायी समाजव्यवस्थेने पीडला गेला आहे. साहजिकच धर्म, रूढी, परंपरा इत्यादीनी माथी मारलेले बहिष्कृत जगणे हा सर्व समाजाच्या अनुभवाचा भाग आहे. म्हणून दलित साहित्यिक जेव्हा आपले अनुभव व्यक्त करतो तेव्हा ते अनुभव त्या साहित्यिकाप्रमाणेच त्याच्या समूहाचेही अनुभव असतात. त्यामुळे कोणत्याही दलित साहित्यकृतीमध्ये व्यक्त होणारी अनुभूती ही समूहाची अनुभूती असते. उदा. दलित आत्मकथनांचा विचार केला तरी यांतील 'मी' चा अनुभव केवळ 'मी'चाच राहात नाही तर तो दलित समाजाचा होतो, 'आम्ही'चा बनतो .

**दलित साहित्य हे चळवळीचे साहित्य**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे लढे उभे केले ते सर्व मानवमुक्तीसाठी होते. त्यातून आणि आंबेडकरी तत्त्वज्ञातून दलित साहित्य आकाराला आले. म्हणूनच दलित साहित्याला चळवळीचे साहित्य मानले जाते. या संदर्भात प्रा.



दत्ता भगत यांचे मत लक्षात घेता येईल. ते म्हणतात, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या आत्मसन्मानाची चळवळ सुरू केली. समता, न्याय, बंधुत्वाचा पुरस्कार केला. त्याआड येणाऱ्या रूढी धर्मग्रंथांना नकार दिला. हे सुखासुखी घडले नाही. त्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागला. ह्या संघर्षाचे चित्रण दलित साहित्यात अवतरले. म्हणून या साहित्यात वर्णव्यवस्थेविरुद्ध संघर्ष येतो. रूढींना नकार येतो आणि समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्वाचा पुरस्कार येतो. दलितांच्या चळवळीची ही मागणी पूर्ण झालेली नाही. सांसदीय पद्धतीच्या लोकशाहीची एक मर्यादा असते. ह्या पद्धतीत परिवर्तन मंद स्वरूपात होते, पण परिवर्तन होणे अटळही असते. म्हणूनच सांसदीय लोकशाही मजबूत होऊ शकेल अशीच ही मागणी असल्यामुळे दलितांची चळवळ गतिशील राहणे आवश्यक असते. दलित साहित्य गतिशील चळवळीचे प्रतिबिंब असणारे साहित्य आहे. म्हणूनच काही साहित्यिकांना दलित साहित्य हे परिवर्तनाचे साधन वाटते. चळवळ आणि चळवळीचे प्रतिबिंब असणारे दलित साहित्य ह्यांचा सांधा ह्या कारणामुळे अतूट आहे.' प्रा. भगत यांच्या मतावरून दलित साहित्य ही एक चळवळ आहे, हे स्पष्ट होते. मराठी साहित्याच्या इतिहासात दलित साहित्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. चळवळीतून जन्मलेल्या या दलित साहित्याने महाराष्ट्राच्या बाहेरही आपली सशक्त परंपरा निर्माण केली आहे.

**दलित साहित्याची वाटचाल**

दलित साहित्यामध्ये कविता हा अत्यंत प्रभावी ठरलेला साहित्यप्रकार आहे. हजारो वर्षापासून दलित मनाचा झालेला कोंडमारा प्रथमत: कवितेमध्ये स्फोट होऊन प्रकट झाला. या कवितेमधून व्यक्त झालेली जाणीव ही पारंपरिक मराठी कवितेपेक्षा वेगळी आहे. दलितांचे जीवन त्यातील दु:ख, दैन्य, दास्य, शोषण याविषयी दलित कविता बोलते. दलित कवितेतून आंबेडकरी विचार विद्रोही शब्दकळा घेऊन अवतरलेला आहे. दलित कवितेने तळागाळातील माणूसाला आपला विषय केला. बहिष्कृत मानल्या गेलेल्या, चिरडल्या गेलेल्या वेदनांना नवा अर्थ दिला. 'स्व' अनुभव आणि 'स्व' भाषा यांच्या संकरातून दलित कविता आकाराला आलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालविलेल्या दलित उद्धाराच्या चळवळीतून दलित कविता आकाराला आलेली दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालवलेल्या नियतकालिकातून ही कविता प्रारंभी डोकावताना दिसते. १९६० पूर्वी किसन फागुजी बनसोड, वामन कर्डक, दीनबंधू शाहीर हेगडे, सोकले, लखमापूरकर इत्यादी कवींनी दलित कविता

लिहिलेली आढळते. पण पुढे नामदेव ढसाळांचा 'गोलपिठा'च्या रूपाने दलित कवितेला गती मिळाली. त्यामुळे दलित कवितेचा सामर्थ्यशाली आविष्कार नामदेव ढसाळ यांच्यापासून झाला असे म्हणता येते. नामदेव ढसाळ यांच्याबरोबर दया पवार, अर्जुन डांगळे, ज. वि. पवार, वामन निंबाळकर, प्रल्हाद चेंदवणकर, केशव मेश्राम, यशवंत मनोहर इत्यादी अनेक कवींनी दलित कवितेला समृद्धता प्राप्त करून दिलेली आहे.

दलित कवींच्या कवीतेला क्रांतीचा परिवर्तनाचा ध्यास लागलेला दिसतो. त्यामुळे शोषणाला नकार देत व त्याविरुद्ध विद्रोह करत दलित कविता आपली समतावादी मूल्ये मांडताना दिसते. दलित कवितेतील संवेदना म्हणजे कवीच्या अंतःकरणातील भावनेला फुटलेले मानवतेचे झरे आहेत. त्यांच्या अभिव्यक्तीला कृत्रिमतेचा वास येत नाही. त्यांच्या कवितेत अस्पृश्यता, जातीयता, दारिद्र्य, त्याबद्दल चीड आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेला निर्भीडता प्राप्त झाली आहे. गोलपिठा (नामदेव ढसाळ), नाकेबंदी (ज. वि. पवार), गावकुसाबाहेरील कविता (वामन निंबाळकर), उत्खनन (केशव मेश्राम), उत्थानगुंफा (यशवंत मनोहर) छावणी हलते आहे (अर्जुन डांगळे), ऑडिट (प्रल्हाद चेंदवणकर), सुरुंग (त्र्यंबक सपकाळे), कोंडवाडा (दया पवार), होरपळ (भीमसेन देठे), रक्तखुणा (बा. स. हाटे), प्रवर्तक (गौतम शिंदे), बस्तान (अशोक पाटील), विमुक्त (दामोदर मोरे), दिशा (ज्योती लांजेवार), फिर्याद (हिरा बनसोडे) हे गाजलेले कवितासंग्रह पाहिल्यास दलित कवितेची दमदार सुरुवात लक्षात येते. या सर्वच कवींची आंबेडकरांवर प्रचंड श्रद्धा आहे. ज. वि. पवार 'आज ५० वर्षांनी' कवितेत म्हणतात,

*"तू झालास परिस्थितीवर स्वार*
*आणि घडविलास नवा इतिहास*
*तू झालास मूक समाजाचा नायक*
*आणि जागा केला तू बहिष्कृत भारत"*

डॉ. आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानामुळे दलित समाजामध्ये आत्मभान आले. नवी वैचारिक जागृती आली. म्हणूनच सनातनी प्रवृत्तीविरुद्ध दलित कवी शब्दांचे शस्त्र घेऊन मैदानात उतरलेले दिसतात आणि प्रतिगामी कृतीचा निषेध करताना पाहायला मिळतात. नव्या पिढीतील अनेक कवीमध्ये ही आंबेडकरी विचाराच्या प्रतिभेची प्रगल्भता जाणवते. 'अस्मितादर्श'सारख्या नियतकालिकातूनही अनेक दलित कवी नावारूपाला येत आहेत. तसेच संजयकुमार सोनवणे, राजेंद्र सोनावणे,



उत्तम अंभोरे, वाल्मिक अहिरे, उषा हिंगोणेकर, शशिकांत हिंगोणेकर, डी. बी. जगत्पुरिया यासारख्या नव्या पिढीतील अनेक दलित कवींचे कवितासंग्रह प्रकाशित होत आहेत. थोडक्यात दलितांच्या वेदनेचा आणि शोषणाचा आलेख दलित कवितेतून मांडला गेलेला दिसतो.

दलित कवितेप्रमाणेच दलित कथांमधूनही वेदनांची आणि दुःखाची जाणीव मांडलेली दिसून येते. डॉ. आंबेडकरांनी चालविल्या 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' यासारख्या नियतकालिकातून दलित कथा जन्माला आलेली दिसते. दलित कथेचा गौरव करताना डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, दलित कथेमुळे मराठी कथेला समृद्धता आलेली आहे; तिचे वैभव वाढले आहे.[१६] दलित कथेला वास्तवाचे भान आहे. दलित कथेतून दलितांच्या जाणिवा आणि प्रश्न सहजपणे मांडलेले दिसून येतात. ती व्यक्तिगत असली तरी तिच्यातून समूहमन प्रकटते. अलिकडची दलित कथा शैली आणि आशयाच्या दृष्टीने बरीच पुढे गेलेली दिसून येते. प्रारंभीच्या काळात तुकाराम पुरोहित आणि बंधू माधव हे कथाकार विशेष लक्षणीय ठरलेले दिसतात. त्यांनी सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, मनोवैज्ञानिक आणि प्रेम अशा विविध विषयावर कथा लिहिलेल्या दिसून येतात, पुढे माधव कांबळे, गायकवाड, मालोजी जाधव अशा लेखकांनी दलित कथेचे लेखन केलेले दिसून येते.

डॉ भालचंद्र फडके यांनी ज्यांना दलित कथेचे शिल्पकार संबोधले आहे ते अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल यांनी दलित कथेला यशोशिखरावर नेलेले दिसून येते. याशिवाय ना. रा. शेंडे, दया पवार, वामन होवाळ, केशव मेश्राम, योगिराज वाघमारे, अर्जुन डांगळे, अमिताभ, योगेंद्र मेश्राम यांनीही सक्षमपणे कथालेखन केलेलले दिसून येते. माधव कोंडविलकर, शरणकुमार लिंबाळे, अविनाश डोळस, भीमराव शिरवाडे, सुधाकर गायकवाड, सुखराम हिवराळे आणि अलीकडे 'अस्मितादर्श' नियतकालिकातून प्रकाशझोतात आलेले धर्मराज निमसरकर, शांताबाई कांबळे, अनंत राऊत, रविचंद्र हडसनकर, बबन लोंढे, भीमसेन देठे, एकनाथ सोनवणे, उत्तम मारुती कांबळे, किशोर घोडके, संजीवकुमार सोनवणे, प्रकाश मोगले या कथालेखकाचाही उल्लेख करता येईल. बैल्याचा बैल, वेसकरकीची काठी, बंदा गुलाम, महार जन्माची कथा, विखारी भाकर, सारं आभाळ फाटलय, आम्हीही माणसे आहोत, गगनाला गवसणी या बंधू माधव यांच्या कथा गाजलेल्या आहेत. बंधू माधव आपल्या कथेच्या संदर्भात म्हणतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ज्वालाग्राही

तत्त्वज्ञानातील ठिणगी घेऊन तिच्या सहाय्याने मी दलितांना पेटवून उठवित होतो.[१७] यावरून बंधू माधव यांच्या कथा अन्यायाविरुद्ध प्रतिकार करणाऱ्या आणि विद्रोह व्यक्त करणार्या कथा आहेत असे म्हणता येते.

अण्णाभाऊ साठे यांचे खुळंवाडी, बरबाद्या कंजारी, भानामती, कृष्णाकाठच्या कथा, गजाआड, चिरानगरची भुतं, फरारी, काडतूस इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांनी महार मांगाच्या दुःस्थितीचे चित्र उभे केलेले दिसते. परिवर्तनाशी नाते सांगणारी आणि सामाजिक आंदोलनाला प्रेरणा देणारी अशी त्याची कथा आहे. शंकरराव खरात यांनीही प्रभावी कथालेखन केलेले दिसून येते. बारा बलुतेदार, तडीपार, सांगावा, टिटवीचा फेरा, सुटका, दौंडी, आडगावच पाणी, गावशिव, मुलाखत हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. शंकरराव खरात यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सहवास लाभलेला होता. त्यामुळे आंबेडकरी विचारांची प्रेरणा सातत्याने त्यांच्या कथांमधून दिसून येते. खरातांनी दुःखीतांचे विश्व मनाच्या तळमळीने व्यक्त केलेले आहे. दलित कथेच्या प्रांतात बाबूराव बागूल यांचे महत्त्वपूर्ण योगदान दिसते. त्यांनी 'जेव्हा मी जात चोरली होती', 'मरण स्वस्त होत आहे' यासारखे कथासंग्रह लिहिलेले आहेत. त्यांच्या कथेतील विद्रोह वाचकाला अंतर्मुख करायला लावणारा आहे. समाजव्यवस्थेतील उतरंडीला आणि देवधर्म परंपरेला बागुल यांची कथा विरोध करताना दिसते. त्यांच्या कथेचा गौरव करताना, म. सु. पगारे म्हणतात, मराठी कथा साहित्यामध्ये दलित कथेचा मानदंड स्वीकारायला लावणारी बाबुराव बागुल यांची कथा आहे.[१८] यावरून बाबूराव बागूल यांच्या कथालेखनाचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. नंतरच्या काळात दलित कथेचा विकास साधणारे काही कथालेखक उदयाला आले. त्यामध्ये प्रामुख्याने केशव मेश्राम (खरवड), वामन होवाळ (बेनवाड, येळकोट), योगिराज वाघमारे (उद्रेक, बेगड, गुडदाणी), अर्जुन डांगळे (ही बांधावरची माणसं), योगेंद्र मेश्राम (रक्ताळलेली लक्तरे), अमिताभ (पड), उर्मिला पवार (सहावं बोट, चौथी भिंत), सुखराम हिवराळे (विश्वगंगेच्या काठी) इ. कथालेखकांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. अलीकडे 'अस्मितादर्श' या नियतकालिकाद्वारे अनेक दलित कथालेखक आणि त्यांच्या कथा विविध प्रश्नांसह आणि समस्यांसह वाचकांसमोर येत आहेत. त्यांच्या कथांमुळे निश्चितच दलित कथेचा विकास साधला जात आहे असे म्हणता येते.

मराठीत दलित लेखकांनी फारसे कादंबरी लेखन केलेले दिसत नाही. संख्यात्मकदृष्ट्या मागे पडलेली दलित कादंबरी गुणात्मकदृष्ट्या मात्र श्रेष्ठ दर्जाची



असलेली दिसून येते. दलित कादंबरीतील जाणीव ही प्रामुख्याने सामाजिक आहे. त्यामधील जीवन हे दलितांचे वास्तव जीवनदर्शन आहे. आर्थिक, सामाजिक कोंडी हा या कथानकाचा गाभा आहे. परंतु या असल्या जीवनाला जबाबदार असलेल्या घटकांचा शोध आंबेडकरी नैतिकतेने कादंबरीत चित्रित केलेला दिसून येतो. या कादंबरीतील व्यक्तिरेखा भारतीय समाजव्यवस्थेतील अस्पृश्यता व दारिद्र्य भोगलेल्या आहेत. समाजव्यवस्थेतील शोषणाशी टक्कर द्यायला निघालेल्या आहेत. पारंपरिक व्यवस्थेविरुद्ध विद्रोह करून न्याय हस्तगत करण्यासाठी त्या प्रकटलेल्या आहेत. अशा विषयाच्या दृष्टीने लक्षवेधी ठरलेल्या कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखकांमध्ये प्राधान्याने अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, केशव मेश्राम, हरिभाऊ पगारे, भीमसेन देठे, अशोक लोखंडे, सुधाकर गायकवाड इत्यादी कादंबरीकारांचा नामोल्लेख करावा लागेल. त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून दलित जीवनाचे चित्रण केले आहे.

अण्णा भाऊ साठे यांच्या साधारणपणे बत्तीस कादंबऱ्या प्रकाशित आहेत. वारणेच्या खोऱ्यात, चित्रा, फकिरा, वैजयंता, चंदन, अलगुज, माकडीचा माळ, आवडी, गुलाम, चिखलातील कमळ, धुंद, कुरूप, तारा, अहंकार, मयुरा, वारणेचा वाघ, पाझर, रानगंगा, अग्निदिव्य, रानबोका, आघात, केवड्याचं कणीस, आग, संघर्ष, रुपा, मूर्ती, मंगला, डोळे मोडीत राधा चाले, मास्तर, रत्ना, फुलपाखरू या कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवन चित्रणाबरोबर काही अंशी दलित जीवन चित्रणही केलेले आढळून येते. सुभाष सावरकर यांना अण्णाभाऊंच्या कादंबरीविश्वाला समाजपरिवर्तनाची विलक्षण आस लागलेले आहे असे वाटते. यावरून अण्णाभाऊंच्या कादंबरी लेखनाचे महत्त्व लक्षात येते. शंकरराव खरात यांनीही दलित जीवनाचे यथार्थ चित्रण केलेले आहे. हातभट्टी, मी मुक्त! मी मुक्त, झोपडपट्टी, गावचा टिनोपाल गुरुजी, मसालेदार गेस्ट हाऊस, पारधी, फुटपाथ नंबर एक या कादंबऱ्यांमधून त्यांनी दलित जीवन मांडलेले आहे. बाबूराव बागुलांच्या सूड, अघोरी या दलित कादंबऱ्या मात्र साहित्यविश्वात महत्त्वपूर्ण ठरलेल्या आहेत, याशिवाय हकिकत आणि जटायू (केशव मेश्राम), हाडकी हाडवळा (नामदेव ढसाळ) श्राद्ध (उत्तम कांबळे), भडास (डॉ. अनिल सपकाळ), उचल्या व हिंदू (शरणकुमार लिंबाळे) या काही महत्त्वपूर्ण दलित कादंबऱ्याची दखल घ्यावी लागेल. उपरोक्त दलित लेखकांनी दलित कादंबरी समृद्ध करण्याचा प्रयत्न केलेला असला तरी कथेच्या आणि कवितेच्या तुलनेमध्ये दलित कादंबरी कमी सामर्थ्यशाली राहिलेली दिसून येते.

दलित नाटक हा साहित्यप्रकार खऱ्या अर्थाने दलित साहित्य चळवळीला सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचवणारा आहे. दलित साहित्य चळवळीसोबत उदयाला आलेल्या दलित नाटकाच्या पूर्वी जलशांमधून आंबेडकरी विचार मांडला जात होता. वगनाट्याच्या माध्यमातूनही दलितांचे प्रश्न मांडले गेले आहेत, शेतकऱ्यांच्या शोषणाचे प्रश्न मांडले गेले आहेत. अण्णा भाऊ साठे, शाहीर अमरशेख, दादू इंदुरीकर, भाऊ फक्कड, बापू नारायणगावकर, शिवा संभा कोल्हापूरकर, दगडू साळी, तात्या सावळकर अशा अनेकांनी लोकनाट्य आणि वगनाट्य सादर करून दीनदलितांची दुःखे मांडलेली आहेत. किसन फागुजी बनसोड यांनी मुंबई वैभव, संत चोखामेळा, पंचरंगी तमाशा इत्यादी नाटकांमधून अस्पृश्यतेची व अस्पृश्यता पाळणाऱ्या माणसाची थट्टा केली आहे. खरे तर दलित नाटकांची निर्मिती डॉ. आंबेडकर यांच्या चळवळीबरोबरच होत होती. म. भी. चिटणीसांनी 'युगयात्रा' हे नाटक आंबेडकरांच्या प्रेरणेतून लिहिले आणि त्यांच्या उपस्थितीतच सादर केले. यामधून दलित नाटकाची वाटचाल गतिमान झाल्याचे दिसून येते. दलित चळवळीमुळे अनेक दलित नाटककार पुढे आलेले दिसून येतात. दलित नाटकाला लोकनाट्य, आंबेडकरी जलसे, सत्यशोधक जलसे यांनी पार्श्वभूमी तयारी करून दिली. पुढे दत्ता भगत, भी. शि. शिंदे, नारनवरे, प्रेमानंद गज्वी, टेक्सास गायकवाड, अविनाश डोळस, प्रभाकर दुपारे इत्यादी अनेक नाटककारांनी दलित नाटक समृद्ध केले.

नाटकांबरोबरच दलित एकांकिकानी समाजप्रबोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य केल्याचे दिसून येते. जी दलित नाटके व एकांकीका लक्षणीय ठरल्या त्यात प्रामुख्याने माणुसकीचे बंड, नवी वाट, कैफियत, खेळीया, इथे माणसाला स्थान नाही, पोतराज, उंबर, नरबळी, आम्ही देशाचे मारेकरी, देवनवरी, तनमाजोरी, थांबा रामराज्य येत आहे, वाटा-पळवाटा, उत्सव, ढोल, घोटभर पाणी, आवर्त, गहाण, किरवंत, काळोखाच्या गर्भात, आंधळ्याची वरात, देशाची मारेकरी, शरण मी बुद्धाला, आक्रोश, शापित, शंबूक, सूर्यास्त, कैफियत, स्मारक, पुरुष, नोकरीच्या जाळ्यात, मृत्युपत्र, मृत्यूशाळा, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, बायको मी देवाची या कलाकृतींचा उल्लेख करता येईल. दलित रंगभूमीला बळ प्राप्त करून देण्यासाठी संबोधी, उन्मेश, पँथर्स थिएटर, मुक्तकला नाट्यसंस्था, नवचैतन्य रंगमंच आणि बोधी मंडळ अशा काही नाट्यसंस्था कार्यरत असल्याचे दिसून येते. एकूण दलित नाटकांचे कार्य मौलिक आहे. दलित चळवळीमध्ये त्याने सिंहाचा वाटा उचलला आहे. दलित संस्कृती, आंबेडकरवादी तत्त्वज्ञान व अस्मिता मांडण्यात



आज दलित नाटक यशस्वी ठरत आहे असे दिसून येते.

दलित साहित्यामध्ये दलित आत्मकथनांनी आपला स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटवलेला दिसून येतो. अन्याय, अत्याचाराने भरडून निघालेल्या दलितांचे जीवन चित्रण आत्मकथनांतून येते. हा वास्तवदर्शी साहित्यप्रकार आहे. दलित आत्मकथनांची वैशिष्ट्ये सांगताना डॉ. आरती कुलकर्णी म्हणतात, ''दलितांची आत्मकथने ही आत्मपर लेखन असले तरी रूढ आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराहून त्यांचे निराळेपण आता सर्वांनी मान्य केले आहे. आत्मचरित्रात असलेल्या व्यक्तित्वाचा नव्याने वेध घेतला जातो. तर आत्मकथनात नसलेल्या व्यक्तित्वाचा शोध घेतला जातो.''[११] स्वतःला जे जगणे प्राप्त झाले व जे सामाजिक वास्तव भोगावे लागले ते निर्भिडपणे प्रांजळपणे सांगावे या हेतूने दलित आत्मकथने जन्माला आली आहेत. दया पवार (बलुतं), प्र. ई. सोनकांबळे (आठवणींचे पक्षी), माधव कोंडविलकर (मु. पो. देवाचे गोठणे), लक्ष्मण माने (उपरा), उत्तम बंडू तुपे (काट्यावरची पोट) या लेखकांनी लिहिलेली आत्मकथने दलितांचे जीवन दर्शन घडवतात. हे जीवन एकट्या लेखकाचे नसून ते त्याच्या त्याच्या जाती-जमातीचे आहे. भारतीय समाजातील बहिष्कृत केलेल्या जाती समूहाचे हे जीवन आहे.

दलित आत्मकथानांतून दलितांचे दुःख, त्यांचे दारिद्र्य, त्यांना भोगावी लागणारी अस्पृश्यता, ब्राह्मणी समाजव्यवस्थेचे शोषण यांची ओळख पटते. हजारो वर्षापासून हा समाज कसा पायदळी तुडवला गेला होता याची वाचकांना जाणीव होते. वरील आत्मकथनकाराबरोबर लक्ष्मण गायकवाड (उचल्या), शंकरराव खरात (तराळ अंतराळ) शरणकुमार लिंबाळे (अक्करमाशी), रुस्तुम अचलखांब (गावकी), कुमुद पावडे (अंतःस्फोट), शांताबाई कांबळे (माझ्या जल्माची चित्तरकथा), मल्लिका अमरशेख (मला उद्ध्वस्थ व्हायचय) बेबी कांबळे (जिन आमुचं), नरेंद्र जाधव (आमचा बाप आणि आम्ही), किशोर शांताबाई काळे (कोल्हाट्याच पोर), दादासाहेब मल्हारी मोरे (गबाळ), रतनलाल सोनग्रा (सोनजातक), नानासाहेब झोडगे (फांझर), भीमराव गस्ती (बेरड), बाळासाहेब गायकवाड (ख्रिस्ती महार), आर. के. त्रिभुवन (दे दान सुटे गिऱ्हाण), राम बसाखेत्री (मातीचे आकाश), जनाबाई गिऱ्हे (मरणकळा), शांताबाई दाणी (रात्रंदिन आम्हा), मुक्ता सर्वगोड (मिटलेली कवाडे) यांची आत्मकथने ही प्रभावी ठरलेली दिसून येतात. स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथनातून दलित स्त्रियांचे विश्व अधोरेखित झाले आहे. आत्मकथने लिहिणारे लेखक महाराष्ट्रातल्या विविध

भागातून आलेले असल्यामुळे विविध बोलीभाषा, विविध जाती समूहांचे जीवन आणि त्यांची लोकसंस्कृती यांचे आत्मकथनातून दर्शन घडते. दलित आत्मकथनांनी मराठी साहित्यसृष्टीत महत्त्वाचे यश मिळवले आहे. याशिवाय वैचारिक निबंध वांङ्मयाची आणि समीक्षात्मक लेखनाची मोठी परंपरा दलित साहित्यात आढळून येते.

थोडक्यात १९६० नंतर उदयाला आलेल्या दलित साहित्याने वैश्विक स्तरावर आपले महत्त्व सिद्ध केले आहे. दलित साहित्याने दलितांच्या व्यथा वेदनांचा, दुःखाचा आवाज जनतेसमोर मांडलेला आहे. अर्थातच या साहित्याला बुद्ध, फुले, आंबेडकर यांची प्रेरणा आहे. नकार आणि विद्रोह या दलित साहित्यातील महत्त्वपूर्ण भूमिका मराठी साहित्यामध्ये आज रुजल्या आहेत. दलित साहित्याच्या विद्रोह आणि नकारावर आक्रस्ताळेपणाचा, एकसुरीपणाचा आणि प्रचारकीपणाचा आरोप केला जात असला तरी हा आरोप एकांगी आणि चुकीचा वाटतो. कारण दलित साहित्याची निर्मिती ही दुःख आणि वेदना भोगणाऱ्या समाज समूहाचा उत्स्फूर्त आविष्कार आहे. त्यामध्ये अस्सल जीवनानुभव आहे, हे कोणीही अमान्य करणार नाही.

●●

संदर्भ :

१. जोशी लक्ष्मणशास्त्री, 'निकाय', ऑ. सप्टें., १९७६, पृ. ५
२. जोशी लक्ष्मणशास्त्री, 'वैदिक संस्कृतीचा विकास', पृ. ३२
३. माने डी. डी., 'दलित जीवन आणि मराठी वाङ्मय', अप्रकाशित प्रबंध, पृ. ३
४. मांडे प्रभाकर, 'दलित साहित्याचे निराळेपण', पृ. २४
५. मेश्राम केशव, 'दलित साहित्य वेदना आणि विद्रोह', पृ. २८
६. वानखेडे म. ना., 'अध्यक्षीय भाषण, स्मरणिका', पृ. ६७
७. कऱ्हाडे सदा, 'दलित साहित्याच्या निमित्ताने', सत्यकथा, पृ. २३
८. ढसाळ नामदेव, 'आम्ही', दिवाळी अंक, पृ. ७७
९. पवार ज. वि., 'नाकेबंदी', प्रस्तावनेतून
१०. मनोहर यशवंत, 'उत्थानगुंफा', पृ. ७
११. कुलकर्णी गो. म., 'दलित साहित्य प्रवाह आणि प्रतिक्रिया', पृ. २२
१२. चिटणीस म. भी., 'अस्मितादर्श', जाने / फेबु., १९७४
१३. कुलकर्णी गो. म., 'दलित साहित्य : प्रवाह आणि प्रतिक्रिया', पृ. ७८
१४. फडके भालचंद्र, 'दलित साहित्य वेदना आणि विद्रोह', पृ. ७४



१५. मनोहर यशवंत, 'दलित साहित्य, सिद्धान्त आणि स्वरूप', पृ. १२५, १२६
१६. पानतावणे गंगाधर, चैत्य, पृ. ९२
१७. माधव बंधू, 'मी आणि माझे लेखन', अस्मितादर्श, दिवाळी अंक, १९७६, पृ. १५९
१८. पगारे म. सु., दलित साहित्याचा इतिहास, प्रशांत प्रकाशन, जळगांव, २००५, पृ. ११४
१९. कुलकर्णी आरती, दलित आत्मकथेच्या मूल्यमापनाचा विचार, लोकानुकंप, एमेजू, २००१,

## ८.
# कादंबरी : एक साहित्यप्रकार

डॉ. सतीश कामत

**प्रास्ताविक**

विविध प्रकारच्या आणि प्रकृतीच्या लेखनासाठी 'साहित्य' हा शब्दप्रयोग केला जात असला तरी सर्व साहित्य एकसारखे नसते. आशय, अभिव्यक्ती, आकार व परिघ यानुसार साहित्याचे अनेक प्रकार जन्मास आलेले आढळतात. साहित्यप्रकाराची संकल्पना निश्चित करताना वेगवेगळ्या संज्ञा वापरल्या जात असल्या तरी ललित साहित्य व ललितेत्तर साहित्य हे विभाजन मुख्यत्वे रूढ झालेले आढळते. ज्याला आपण वाङ्मय असे म्हणतो त्याच्या सैद्धांतिक चर्चेत विशेषत्वाने ललित साहित्याचा विचार केला जातो. कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललितगद्य असे ललित साहित्याचे प्रकार सांगितले जातात. त्यात कादंबरी हा एक महत्त्वपूर्ण साहित्यप्रकार असून विशिष्ट स्वरूपाच्या गद्य वाङ्मय प्रकाराचा निर्देश करण्यासाठी ही संज्ञा वापरली जाते.

**कादंबरी : एक साहित्यप्रकार**

माणूस हा गोष्टीवेल्हाळ प्राणी आहे. गोष्ट सांगणे आणि ऐकणे त्याला आवडते. लहान लहान गोष्टींची साखळी गुंफून मोठी गोष्ट सांगण्याच्या प्रयत्नातून 'कादंबरी' जन्मास आली असावी, असा कयास आहे. तरी कादंबरी म्हणजे काय? याचे नेमके उत्तर सापडत नाही. या प्रश्नाचे विवेचन करण्याचा प्रयत्न अनेकांनी केला आहे. अगदी प्रारंभी म्हणजे १८२९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या मोल्सवर्थच्या मराठी इंग्रजी शब्दकोशात 'कल्पित गद्यकथा' या अर्थाने 'कादंबरी' हा शब्द आला आहे.

कादंबरी हे वाङ्मय प्रकाराचे नाव बाणभट्टाच्या 'कादंबरी' या ग्रंथावरून पडले असावे, असे नि.सी. सरवटे यांना वाटते.[१] का. बा. मराठे यांनी 'Novel'



या इंग्रजी शब्दाला प्रतिशब्द म्हणून 'नावल' हा शब्द वापरलेला आहे.[२] प्राचीन काळी मध्ययुगात इटलीमध्ये उगम पावलेल्या अशा गद्य वाङ्मय प्रकाराला 'नॉव्हेला' असे संबोधले जात होते. त्यावरून 'नॉव्हेल' हे नामकरण काहीतरी नवे अद्भूत या अर्थाने इंग्रजीत आले असावे. इंग्रजीतील नॉवेलच्या धर्तीवर सुरुवातीला मराठीत 'नावल' ची संकल्पना रूढ झाली असावी.

'कादंबरी' या शब्दाचा मूळ अर्थ 'कदंब पुष्पाची मदिरा' किंवा 'आसव'[३] असाही सांगितला जातो. मद्यार्क याचा पहिला गुण म्हणजे गुंगवून टाकणे, विसर पाडणे. कथन चातुर्याने, रससिद्धीमुळे, भाषेच्या माधुर्याने वाचकाला स्वतःचाही विसर पाडते ती कादंबरी. हेच लक्षात घेऊन मराठीत 'कादंबरी' हे नामकरण रूढ झाले. 'कादंबरी' ही संज्ञा कशी प्रचलित झाली हे वरील विवेचनावरून लक्षात येत असले तरी 'कादंबरी' ही संज्ञा स्पष्ट होण्यासाठी विविध मान्यवरांच्या व्याख्यांचा परामर्श घेणे आवश्यक वाटते.

**कथानक**

सुरुवातीच्या काळात अभ्यासकांनी इतर घटकांपेक्षा कथानकाला महत्त्व दिल्याचे दिसते. भरतमुनींनी देखील नाट्यशास्त्रात 'संविधानक' म्हणजेच कथानकाला महत्त्व दिल्याचे दिसून येते. याविषयी ॲरिस्टॉटल म्हणतो, "All human happiness or misery takes the form of action the end for which we live is a certain kind of activity, not a quality, character gives us qualities, but it is in our actions - what we do that we are happy or the reverse"[3] म्हणजेच ॲरिस्टॉटलही कथानकाला ग्राह्य मानून ते जास्त श्रेष्ठ असल्याचे सांगताना दिसतो. याविषयी फॉर्स्टरही कादंबरीच्या अनुषंगाने घटकाचा विचार करताना 'गोष्ट सांगणे' हेच कादंबरीचे मूळतत्त्व आहे, असे मानतो.

घटनांची कालक्रमानुसार मांडणी केली की कथा तयार होते आणि या घटनांचा कार्यकारण संबंध स्पष्ट केला की कथानक तयार होते. कथानक हा कादंबरीचा सांगाडा असतो. म्हणून कथानकाशिवाय कादंबरीची संरचना शक्य नसते. अशा कथानकाला प्रारंभ, मध्य, अंत या तीन अवस्था असतात. त्यामुळे घटना - प्रसंगात एकसूत्रता येते व सुसंगत कथानक आकारास येते.

कथानक हा कादंबरीचा गाभा आहे. कथानकात मौलिकता, संभवनीयता, सुसंघटितपणा, रोचकपणा इत्यादी गुण असावे लागतात. कथानकात कथेपेक्षा जीवनचित्रणाला अधिक महत्त्व असते. कथानकाच्या संदर्भात अनेक उपकथानके

उभी राहतात. या सर्वांच्या गुंफणीतून आकर्षक कादंबरी जन्मते. थोडक्यात कादंबरीतील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे 'कथानक' होय. कारण कादंबरी हा मूलतः कथनात्मक कराराचा वाङ्मय प्रकार आहे.

**व्यक्तिरेखा**

कथा कोणत्याही नमुन्याची असली तरी तिच्यात व्यक्तिरेखांना महत्त्व असते. प्रगल्भ बुद्धीच्या वाचकांना व्यक्तिरेखांमध्येच अधिक गोडी वाटते. म्हणून ना. सी. फडके, कथारचना चातुर्यापेक्षा व्यक्तिदर्शन चातुर्य दसपटीने महत्त्वाचे आहे.[४] असे म्हणतात. यावरून व्यक्तिरेखा या घटकाचे महत्त्व स्पष्ट होते. डॉ. मदन कुलकर्णी यांनी कादंबरीचे अस्तित्व मुळी मानवी जीवनचित्रणावर अवलंबून असल्याचे सांगून, व्यक्तिशिवाय कथा आकाराला येऊ शकत नाही[५] असे म्हटले आहे. श्री.मा.कुलकर्णी, कुसुमावती देशपांडे आदी अभ्यासकांनीही 'व्यक्तिरेखा' हा घटक महत्त्वाचा मानला आहे. थोडक्यात कादंबरीकाराला स्वतःला जाणवलेले जीवन अभिव्यक्त करण्यासाठी व्यक्तिरेखांची प्रतिसृष्टी निर्माण करावी लागते. वास्तव व्यक्तींचे अवलोकन, आकलन करून आणि त्यात कल्पनेची भर घालून कादंबरीकार आपल्या व्यक्तिरेखा निर्माण करतो.

व्यक्तिरेखांना कादंबरीचे माध्यम मानता येते. कारण त्यामुळे कथानकास अर्थ प्राप्त होतो. कदाचित अनुभवार्थ हा कथानकाप्रमाणेच 'व्यक्तिरेखा' या घटकाच्या साह्याने मूर्त होत असून कलात्म व कथात्म कथार्थाची निर्मिती करणे हेच व्यक्तिरेखेचे प्रमुख कार्य असते.

अलीकडे मानसशास्त्राच्या अभ्यासामुळे व्यक्तिरेखांचेही व्यक्तिमत्त्व उलगडले जाऊ लागले आहे. त्यामुळे व्यक्तिरेखाटनात मनोविश्लेषणाला महत्त्व आलेले आहे. मनोविश्लेषण हे फक्त व्यक्तिरेखांबाबतच शक्य असल्याचे व्यक्तिरेखा या घटकात मनोविश्लेषणाचाही समावेश होतो. कादंबरीतील व्यक्तिरेखा जिवंत बनते ती या मनोव्यापाराच्या चित्रणामुळे. एकूण व्यक्तिरेखा या घटकांमुळे कादंबरीतील घटनांचे आकर्षण वाढते. निवेदन, संवाद यांच्या माध्यमातून कादंबरीत व्यक्तिरेखांचे दर्शन घडते. कारण डॉ. उषा हस्तक म्हणतात त्याप्रमाणे 'व्यक्तिरेखा' हा कादंबरीचा केंद्रबिंदू आहे.

**वातावरण**

कादंबरीत 'वातावरण' हा घटक महत्त्वाचा आहे. किंबहुना वातावरणनिर्मिती हा कादंबरीचा एक लक्षणीय विशेष मानण्यात येतो. कादंबरीतील व्यक्ती कोणत्याही पोकळीत जगत नाहीत. त्यांची मुळे कादंबरीबाहेरच्या जगात नव्हे तर कादंबरीमध्ये



कादंबरीकाराच्या कल्पनाशक्तीने निर्माण केलेल्या वातावरणात सजलेली असतात. कादंबरीचा फलक विस्तृत असल्यामुळे व्यक्तीच्या सभोवतालचे वातावरण प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक तो सगळा बारीक-सारीक तपशील कादंबरीकार पुरवू शकतो. कादंबरीतील व्यक्तींच्या अंतर्बाह्य वर्तनाला चालना देण्याचे फार मोठे सामर्थ्य वातावरणामध्ये असते. कादंबरीकार त्याच्या या सामर्थ्याचा ज्यावेळी उपयोग करून घेतो त्यावेळी कादंबरीतील वातावरणाचे स्वरूप हे केवळ वर्णनात्मक पातळीवर राहत नाही तर कादंबरीच्या रचनेचा एक अविभाज्य दुवा बनते. उदा. 'बनगरवाडी' कादंबरीतील धनगरवस्तीचे वातावरण होय. तिथला निसर्ग कादंबरीच्या आशयाशी एकरूप झाला आहे. चित्रकलेत पार्श्वभूमीला जे स्थान तेच कथात्म साहित्यात वातावरणाला असते, असे म्हणता येईल.

ज्या मानवी जीवनाचे चित्रण कादंबरीत करू इच्छिते, त्या मानवी जीवनाचे अस्तित्व स्थळकालादी पार्श्वभूमी किंवा वातावरणाशिवाय असू शकत नाही. कारण विशिष्ट काळात घडलेल्या विशिष्ट घडामोडींचा परिणाम कादंबरीवर झालेला असतो. उदाहरणार्थ स्वातंत्र्यपूर्व काळात लिहिलेल्या बहुसंख्य कादंबऱ्यांना स्वातंत्र्य चळवळीची, सत्याग्रहाची पार्श्वभूमी लाभलेली आहे. १९६० नंतरच्या 'सिंहासन', 'कोसला', 'धग' या कादंबऱ्यांना मात्र महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय वास्तवाची पार्श्वभूमी लाभलेली आहे. यालाच कादंबरीतील युगधर्माचा प्रभाव असेही म्हणता येईल.

थोडक्यात कादंबरीतील वातावरण अथवा पार्श्वभूमीमुळे कथानक आणि व्यक्तिरेखा यांना वास्तवता आणि दृश्यात्मकता प्राप्त होते. वाचकांच्या मनावर व्यक्तिरेखांचे संदर्भ ठसविण्याचे काम वातावरण करते, असे म्हणता येते.

**कादंबरीतील निवेदन**

कादंबरी हा कथनात्मक वाङ्मय प्रकार आहे. कथन परंपरेतूनच निर्माण झालेले नवे रूप म्हणजे कादंबरीतील 'निवेदन' होय. कोणतीही कादंबरी भाषिक निवेदनाच्या मदतीशिवाय वाचनीय रूप धारण करू शकत नाही. कादंबरीतून व्यक्त होणारे सारे अनुभव आणि त्याची विविध परिमाणे निवेदनातून सूचित होतात. दीर्घ अशा निवेदन तंत्राचा अवलंब करूनच पायरीपायरीने किंवा क्रमाक्रमाने ही परिमाणे त्याला सूचित करावे लागतात. निवेदनाच्या बाबतीत कादंबरीकार अनेकविध तांत्रिक प्रयोग करतात. कारण वास्तवाच्या अनेक विविध रूपांची परिमाणे एकाच ठराविक निवेदन पद्धतीचा अवलंब करून सूचित करता येत नाहीत. निवेदनाचे प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतील

**अ) स्वमुखी निवेदन**

यालाच आत्मनिवेदन किंवा प्रथमपुरुषी निवेदन पद्धती असेही म्हणतात. निवेदन पद्धतीचा हा सर्वसाधारण प्रकार आहे. भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' कादंबरीची सुरुवात मी पांडुरंग सांगवीकर उदा. २५ वर्षाचा आहे. अशी होते. त्यानंतर संपूर्ण कादंबरीत 'पांडुरंग' स्वतःची गोष्ट सांगत राहतो.

**ब) त्रयस्थ निवेदन**

'गारंबीचा बापू' या कादंबरीत प्रारंभी गारंबीचे वर्णन येते. मग हळूहळू तिथली माणसे मग विठोबा, यशोदा, आणि मग बापू यांचे वर्णन येते. बापूची गोष्ट स्वतः बापू सांगत नाही तर लेखक बापूची गोष्ट त्रयस्थपणे आपल्याला सांगत राहतो. या निवेदन पद्धतीलाच तृतीयपुरुषी निवेदन पद्धती असे म्हणतात. 'स्वामी' कादंबरीचे निवेदन हे असेच आहे. तृतीयपुरुषी निवेदक केवळ सूत्र पुढे नेण्यासाठी येतो. बाकीची कथा व्यक्तिरेखांच्या संवादातून उलगडत जाते. पण काही कादंबऱ्यातील तृतीयपुरुषी निवेदक सर्वत्र निवेदक बनतो. पात्राच्या मनात काय चाललय हे तर सांगतोच शिवाय भाष्य - चिंतनही करतो.

**क) पात्रमुखी कथन**

काही वेळा प्रथमपुरूषी किंवा तृतीयपुरुषी निवेदन न वापरता लेखक कादंबरीतील त्या त्या व्यक्तींनाच स्वतःची कथा सांगायला लावतो. त्यामुळे एकच घटना वेगवेगळ्या व्यक्तिरेखांकडून वेगवेगळ्या दृष्टिकोनातून ऐकायला मिळते. उदाहरणार्थ वि. स. खांडेकर यांच्या 'ययाती' कादंबरीतील ययाती, देवयानी, शर्मिष्ठा अशा सर्वच व्यक्तिरेखा स्वतः बद्दल बोलत राहतात. या निवेदन पद्धतीला पात्रमुखी निवेदन असे म्हणतात.

**ड) निवेदनाचे आणखी काही प्रकार**

प्रथमपुरुषी निवेदनाचा तोचतोचपणा टाळण्यासाठी तेच निवेदन पत्रातून किंवा डायरीच्या पानातूनही देता येते. अशा पत्रबद्ध कादंबऱ्या मराठीत आहेत. उदाहरणार्थ सानियाची 'स्थलांतर', पु.भा. भावे यांची 'आकुलिना', श्री. ना. पेंडसे यांची 'लव्हाळी' इत्यादी.

**कादंबरी व इतर काही वांङ्मयप्रकार**

सर्व वाङ्मयप्रकारांच्या स्वरूपविशेषांचा विचार करता कादंबरीचा संकेतव्युह वेगळा ठरताना दिसतो. कादंबरी व इतर वाङ्मयप्रकार यातील साम्यभेदाची चर्चा खालीलप्रमाणे करता येईल.



**कादंबरी आणि कविता**

कादंबरीचे माध्यम गद्य आहे तर कवितेचे माध्यम पद्य आहे. कादंबरीत निर्मितीबरोबरच विश्लेषणही समाविष्ट असते. कवितेत केवळ निर्मिती असते. कादंबरीतील उत्कटता तिच्या दीर्घत्त्वामुळे कमी होऊ शकते. कवितेचे स्वरूप लघू असल्याने उत्कटता अधिक प्रमाणात असते.

कादंबरीचे अनुभव क्षेत्र सीमित नाही त्यामुळे व्यक्तीला असणाऱ्या अनेक परिणामांचा साकल्याने उपयोग करता येतो. महायुद्धासारख्या घटनेपासून ते व्यक्ती व्यक्तींमधील नाजूक भावसंबंधाचा अंतर्भाव असणारे कोणतेही अनुभवविश्व कादंबरीच्या पटलावर रेखाटता येते. व्यक्तीच्या चित्रणाला व्यक्ती, स्थळ, काल, समाज, संस्कृती इत्यादी परिमाणे देता येतात. ही परिमाणे वैशिष्ट्य संपन्न असतात. त्यामुळे व्यक्तीही समाजाचा एक घटक आहे याची प्रचिती कादंबरीत आणून देता येते. कारण ही व्यक्ती आणि समाज यांच्यातील नाते अनेकविध संदर्भाच्या आधारे देता येते. उदाहरणार्थ हमीद दलवाईंची 'इंधन' ही कादंबरी होय.

कादंबरीची रचना काहीशी तंत्र मुक्त असते. इतर वाङ्मयप्रकाराची व कलांची वैशिष्ट्ये कादंबरी सहज आत्मसात करते. कादंबरीत काव्यात्मकताही येऊ शकते. मुक्त स्वरूपामुळे तिच्या अंगी लवचिकता आहे. त्यामुळे काल प्रवाहातील स्थित्यंतरांना सामोरे जाण्याचे बळ कादंबरीच्या अंगी असते, असे म्हणता येते.

**कादंबरी आणि कथा**

ऐतिहासिक दृष्टीने पाहता उपरोक्त दोन्ही साहित्य प्रकार वेगवेगळ्या युगात जन्माला आलेले असल्यामुळे त्यांच्यातील भेद अधिक उघडपणे जाणवतात. या दोन्हीचे संकेतव्यूह स्पष्ट करताना थोरात यांनी म्हटले आहे की, ''लघुकथा आणि कादंबरी यांच्यातील भेद लक्षात घेताना समीक्षकांकडून सर्वसाधारणपणे तीन प्रमुख मुद्दे मांडले जातात. त्यातील पहिला मुद्दा आकारभेदाचा आहे. लघुकथा लघु असते तर कादंबरीच्या आकाराला मर्यादाच नसते. दुसरा महत्त्वाचा मुद्दा एक केंद्रित्वाचा आहे. लघुकथा एक केंद्रीय असते तर कादंबरी अनेक केंद्रीय असते. तिसरा मुद्दा पात्रांच्या स्वरूपाबद्दलचा आहे. पात्रांचे दर्शन घडवणे, त्यांच्या वास्तविक रूपाचा प्रत्यय घडवून आणणे लघुकथेत सिद्ध होते. तर कादंबरीत पात्रात होत जाणाऱ्या बदलाला, त्याच्या विकासाला महत्त्वाचे स्थान असते.''[६] या विधानावरून कादंबरी व कथा यातील साम्यभेदाची कल्पनाही येते.

कादंबरी व कथा दोन्ही कथात्मक गद्य साहित्य प्रकार असले तरी त्यातही फरक आहे. प्रा. फडके म्हणतात त्याप्रमाणे कादंबरी ही उस्तादी गाण्यासारखे

आहे तर कथाही नाटकी गाण्यासारखी आहे. कादंबरीत एकच कथानक असले तरी अनेक उपकथानके व त्याच्या अनुषंगाने अनेक व्यक्ती व अनेक प्रसंग यांची रेलचेल असते. त्यामुळे कादंबरीतून अनेक संस्कार होतात. कथेत एकत्व एक अनुभूती व तिचा संस्कार अधिक परिणामकारकपणे वाचक मनावर घडवायचा असतो. थोडक्यात कादंबरीही कलेकलेने विकसित होणारी इतर कथा ही चंद्रकोरीसारखी असते.

**कादंबरी व नाटक**

''नाटक आणि कादंबरी या दोहोतील महत्त्वाचे सूत्र म्हणजे त्यांच्यामधील कथात्मकतेची समानता होय. या समान सूत्राच्या आधारावर नाटक आणि कादंबरी या दोन साहित्य प्रकारांमध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणावर देवघेव झाली आहे.''[७] यावरून हे दोन्ही महत्त्वपूर्ण कथात्मक गद्य साहित्यप्रकार असल्याचे व एकमेकांना पूरक असल्याचे स्पष्ट होते. असे असले तरी नाटक हे पाहण्यासाठी असते व कादंबरी वाचण्यासाठी असते. कादंबरीमध्ये निवेदन आणि संवाद अशा दोन्ही पातळीवर भाषा वापरली जाते तर नाटकात केव्हा संवादावरच मंदार असते. कादंबरी एकावेळी केवळ एका वाचकाला गुंतवून शकते. नाटक मात्र एकाच वेळी हजारो लोकांच्या अंतःकरणात जाऊन पोहोचू शकते. कादंबरीमध्ये वाचकांचाच विचार केल्यामुळे कादंबरीवरील बंधने कालबाह्य होण्याची शक्यता कमी असते. नाटक हे रंगभूमीवर प्रत्यक्ष सादर करावयाचे असल्याने रंगभूमी, प्रेक्षक व कलाकार या तिन्हीचा विचार करावा लागतो व त्यामुळेच कालबाह्य बंधनांची शक्यता अधिक असते.

कादंबरी अधिक विचारप्रधान असते तर नाटक अधिक भावनाप्रधान असते. कादंबरीप्रमाणे संथ, सावकाश मनाची पकड घेणारा आशय नाटकात उठावदार होईलच असे नाही.

**कादंबरी : काही प्रकार**

कादंबरीच्या स्वरूपाची चर्चा करताना कादंबरीच्या विविध प्रकारांची चर्चा करणे सुद्धा आवश्यक आहे. कादंबरीचे पौराणिक, ऐतिहासिक, अद्भुत, सामाजिक, चरित्रात्मक, आत्मचरित्रात्मक, राजकीय, वास्तववादी असे काही प्रकार कल्पून प्रत्येक प्रकाराची तात्विक चर्चा, व्याख्या मांडण्याचा प्रयत्न ना. सी. फडके, श्री. मा. कुलकर्णी, चंद्रकांत बांदिवडेकर आदी अभ्यासकांनी केलेला आढळतो. याशिवाय इतरही काही अभ्यासकांनी या प्रकाराची तंत्रे, स्वरूप आणि मर्यादाही सविस्तरपणे सांगितलेल्या आहेत. या सर्व विवेचनाचा आधार घेऊन काही



प्रकारांची थोडक्यात चर्चा येथे केलेली आहे.

**पौराणिक कादंबरी**

भारतीय समाजात पौराणिक कथांचे भांडार प्रचंड आहे. महाभारत, रामायण, पुराणकथा, जातक कथा, पंचतंत्र कथा इत्यादींनी भारतीयांची मने संस्कारित झालेली आहेत. लोकसाहित्याची सोन्याची खान येथील जनमानसात लपलेली आहे. त्यामुळे ज्ञानेश्वर, तुकारामाविषयी नवी जिज्ञासा, मध्ययुगीन भक्ती मार्गाविषयी आस्था, महाभारत - रामायणातील कथा बिजावर साहित्यकृती निर्माण करण्याची प्रवृत्ती आधुनिक कालखंडात वाढीला लागलेली आढळते. ''आजच्या जीवनातील परिस्थिती व समस्या यांची उत्तरे देण्यासाठी पौराणिक कथावस्तूंचा उपयोग करणे हा एक पौराणिक कादंबऱ्यांचा प्रमुख उद्देश आहे.''[८] या डॉ. बांदिवडेकर यांच्या मतावरून पौराणिक कादंबऱ्या लिहिण्यामागची भूमिका स्पष्ट होते. जनमाणसांवर संस्कार करण्यासाठी पौराणिक कथा नक्की उपयुक्त ठरतात, असे म्हणता येते. 'अहिल्योद्धार' (ना. के. बेहेरे), 'वत्सला', 'अभिमन्यू' (श्री. परळकर), 'सत्यवान सावित्री' (वि.वा. हडप), 'भूमिकन्या सीता' (भा.वि.वरेरकर), कौंचवध' (वि. स. खांडेकर), 'मृत्युंजय' (रणजित देसाई) या काही कादंबऱ्यांचा या ठिकाणी उल्लेख करता येईल.

**ऐतिहासिक कादंबरी**

ऐतिहासिक कादंबरी हा कादंबरी वाङ्मय प्रकारात एक वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. इतिहास म्हणजे घडलेल्या सत्य गोष्टी हा त्याचा मूलाधार असला तरी त्या आधारे केलेली निर्मिती मात्र स्वतंत्र, स्वायत्त अशी नवनिर्मिती असते. ऐतिहासिक वास्तव भावनात्मक पातळीवरून व्यक्त करीत असताना मानवी जीवनातले एखादे शाश्वत मूल्य लेखकाने मांडलेले असते. म्हणूनच ऐतिहासिक कादंबरी ही केवळ रंजनमूल्य सांभाळणारी नसते तर ती वाचकाच्या चिंतनशीलतेला साद घालणारी वांग्मयपद्धती असते.

इतिहासातील ज्ञान, व्यक्ती आणि घटनाप्रसंग यांच्या पलीकडील अज्ञात भावस्पंधनांचा शोध कलात्मकतेच्या, कल्पकतेच्या साह्याने ऐतिहासिक कादंबरीकार घेतो. उदा. 'श्रीमान जोशी', 'छावा', 'स्वामी', 'झुंज', 'चाणक्य' इत्यादी.

**सामाजिक कादंबरी**

बाबा पद्मनजी हे मराठीतील पहिले सामाजिक कादंबरीकार ठरतात. विधवांच्या दुःस्थितीचा प्रश्न त्यांनी 'यमुना पर्यटन' (१८५७) या कादंबरीत मांडला आहे. सामाजिक कादंबऱ्यामध्ये समकालीन सामाजिक प्रश्न आढळतात. लोकशिक्षण

कादंबरी केवळ एखाद्या राजनैतिक तत्त्वप्रणालीचे खंडन व मंडन करण्यासाठी जन्माला येते. जिच्यातील पात्रांचा प्रचलित व ऐतिहासिक काळातील राजकीय घडामोडींशी प्रत्यक्ष संबंध नसतो तर तिच्यात वावरणाऱ्या पात्रांचा स्वभाव परिपोष, त्याचे परस्परसंबंध, ते ज्या प्रसंगातून वावरतात ते प्रसंग या सर्व गोष्टी त्या विशिष्ट राजनैतिक तत्त्वप्रणालीच्या खंडणार्थ उपयोजलेल्या असतात. तीच कादंबरी केवळ राजकीय या नावाला साजेशी ठरते.[१२] येथे स्थलकाल निरपेक्षता हे वा. ल. कुलकर्णी यांनी राजकीय कादंबरीचे लक्षण मानले आहे. अशा या राजकीय कादंबरीचे लक्षण स्पष्ट करताना डॉ. हरिश्चंद्र थोरात म्हणतात, ''मानवी आयुष्याची प्रत्यक्ष समग्रता आणि अमूर्त राजकीय विचारसरणी या दोन परस्परविरोधी बिंदूंना सतत स्पर्श करीत त्यांच्यात नातेसंबंध निर्माण करण्याचे कार्य चांगली राजकीय कादंबरी करीत असते.''[१३] थोरातांचे हे विवेचन नेमके व राजकीय कादंबरीचे स्वरूप स्पष्ट करणारे आहे. त्यावरून राजकीय कादंबरीचा आवाका स्पष्ट होतो. या धर्तीवर मराठीतील राजकीय कादंबरीचा परामर्श घेता काही ठळक राजकीय कादंबऱ्या समोर येतात. वावटळ (व्यंकटेश माडगूळकर), एल्गार (श्री. ना. पेंडसे), इंधन (हमीद दलवाई), मुंबई दिनांक (अरुण साधू), सरहद्द (शरदचंद्र मुक्तिबोध), साता उत्तराची कहाणी (ग. प्र. प्रधान), बखर एका राजाची (त्र्यं.वि.सरदेशमुख), डोंगर म्हातारा झाला (अनिल बर्वे), सरकारनामा (अजय झणकर), अभिसरण (जी. के. ऐनापुरे) आमदार सौभाग्यवती (रा. रं. बोराडे) या कादंबऱ्यांतून सर्वसाधारण स्वातंत्र्यपूर्व काळातील तत्त्वनिष्ठ राजकारण आणि स्वातंत्र्योत्तर काळातील तत्त्वहीन राजकारण, सत्तास्पर्धा, त्यासाठीच्या तडजोडी, आणीबाणी, त्याचे राजकीय परिणाम, स्त्रियांचा राजकीय सहभाग इत्यादी विषय आले आहेत. एकूण मराठी राजकीय कादंबरी समृद्धतेच्या मार्गावर असल्याचे निदर्शनाला येते.

**'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराची वैशिष्ट्ये**

कादंबरीची सर्वसमावेशक व्याख्या आजवर झालेली नाही. मात्र तिची लक्षणे आणि गुण यावर मात्र वारंवार चर्चा झालेली आहे. कादंबरी या वाङ्मय प्रकाराची वैशिष्ट्ये सांगितली जातात ती पुढील प्रमाणे आहेत.

१. कादंबरी हा एक सर्वसमावेशक वाङ्मय प्रकार आहे.
२. कथात्म प्रकारातला हा एक गद्य वाङ्मय प्रकार आहे.
३. कादंबरीत कल्पना आणि वास्तव यांचे मिश्रण आढळते.
४. कादंबरी हा व्यापक अवकाश असणारा गद्य वाङ्मय प्रकार आहे.



५. सर्वसमावेशकता या गुणामुळे अनेक गोष्टी कादंबरीत सामावतात.
६. कादंबरीत मानवी जीवन व्यवहाराचे व्यापक दर्शन घडते.
७. कादंबरीच्या सामग्रीत कथानक, व्यक्ती महत्त्वाच्या असतात.
८. कथनात्मक निवेदन हे कादंबरीचे महत्त्वाचे लक्षण आहे.
९. कादंबरीत विस्तार हे वैशिष्ट्ये सातत्याने आढळते.
१०.कादंबरीचा विकास ऐतिहासिक, सामाजिक, आधुनिक, पुराणकालीन, वास्तव, अद्भूत, कल्पित, ग्रामीण, दलित इत्यादी अनेक अंगांनी व प्रकारांनी झालेला आहे.
११.घटना, व्यक्ती, वातावरण इत्यादीच्या साहाय्याने मानवी जीवनाशी निगडित असणाऱ्या व्यामिश्र रूपाचे दर्शन कादंबरीत घडते.
१२.काव्य, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, नाटक, कथा इत्यादी वांङ्:मय प्रकाराची विशेष ही कादंबरीत आढळतात.
१३.घटना - प्रसंगांची कार्यकारण शृंखलाबद्धता कादंबरीत आढळते.
१४.मध्यमवर्गीय समाजव्यवस्थेच्या गरजेतून हा वाङ्मय प्रकार उदयाला आला आहे.
१५.कादंबरीने व्यापलेल्या विषयाची वर्गवारी निश्चित करता येत नाही.

कादंबरीचे हे गुण म्हणजे तिच्या वैशिष्ट्यांची एक स्थूल गोळाबेरीज आहे. कादंबरीच्या आकलनासाठी व आस्वादासाठी कादंबरीचे हे गुणविशेष उपयुक्त ठरतात.

**मान्यवर समीक्षकांनी मांडलेला कादंबरी विचार**

१९ व्या शतकाच्या प्रारंभी कादंबरीचे स्वरूप व तिच्या गुणदोषांची चर्चा आढळते. कादंबरीत कोणते घटक असावेत. कादंबरीने काय वर्ज करावे यातून या वाङ्मय प्रकाराला सांकल्पनिक रूप देण्याचा प्रयत्न केल्याची दिसते.

२० व्या शतकाच्या सुरुवातीला वि. का. राजवाडे यांनी कादंबरीविषयी काही तात्त्विक मुद्दे मांडलेले आहेत. युरोपातील Realistic a Romantic यावरून मराठीत अद्भुत व वास्तव असे गट पाडून राजवाडे अद्भुत- वास्तवाच्या पार्श्वभूमीवर कादंबरीची संकल्पना मांडतात व कादंबरीत या दोन्हीची उपस्थिती महत्त्वाची मानतात. समाजाचे वास्तव दर्शन कादंबरीत यावे अशी अपेक्षाही राजवाडेंनी व्यक्त केलेली आहे.

श्री. कृ. कोलटकरांनी कादंबरीला सुभाषित वजा काव्य म्हटले आहे. कादंबरीत कलात्मक सौंदर्य व घटक अवयवांचे सेंद्रिय एकत्व महत्त्वपूर्ण आहे असे त्यांना

व करमणूक ही उद्दिष्टे असली तरी त्याबरोबर जीवनदृष्टी व संस्कृती याचाही प्रभाव सामाजिक कादंबरीवर आढळतो. समाजाची उन्नती ज्या विचारांनी होईल तेच विचार या लेखकांनी मांडले आहेत. प्रारंभीच्या कादंबऱ्या मार्मिक अवलोकन, उत्कृष्ट स्वभावलेखन, तटस्थवृत्ती, मर्यादित तत्त्वचिंतन या दृष्टीने समाधानकारक नसल्या तरी मनोरंजन करण्याच्या दृष्टीने सफल झालेल्या आहेत. स्वप्नरंजन, चटकदार आशय व अभिव्यक्ती, नेटकेपणा इत्यादी वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असलेल्या स्वतंत्र सामाजिक कादंबऱ्याही पुढील काळात निर्माण झालेल्या दिसतात. 'रागिणी' (वि. म. जोशी), 'विधवाकुमारी' (भा.वि. वरेरकर), 'उल्का' (वि. स.खांडेकर), 'ब्राह्मणकन्या' (श्री. व्यं. केतकर), 'भंगलेले देऊळ' (ग.त्र्यं.माडखोलकर), 'विखुरलेले प्रेम' (द.र.कवठेकर) अशा या बहुतेक कादंबऱ्यांमध्ये सद्गुणी व्यक्तीविरुद्ध दुर्गुणी व्यक्ती असा संघर्ष चित्रित करून शेवटी अनीतीने वागणाऱ्यांचा पराजय दर्शवला जातो. मुख्य पात्रे रूढ सामाजिक संकेत यांच्याविरुद्ध लढा पुकारताना दिसतात.

**चरित्रात्मक कादंबरी**

चरित्राचा संबंध व्यक्तीच्या जीवनाची व त्या जीवनातून आकार घेणाऱ्या व्यक्तित्वाशी आहे. व्यक्ती जीवनातील अनेक घटना प्रसंगातून जाताना प्रकट होणाऱ्या तिच्या राग, द्वेष, प्रेम, दंभ इत्यादी मनोविकारांचे दर्शन आपल्याला चरित्रात होते. या चित्रणामुळे चरित्रनायकाचे व्यक्तित्व उजळून निघते. व्यक्तीची महत्वाकांक्षा, सुख-दुःख, यश-अपयश, आजूबाजूचा परिसर इत्यादी गोष्टीतून घडत जाणारे तिचे व्यक्तिमत्त्व चित्रित करणे हे चरित्राचे वाङ्मयीन उद्दिष्ट ठरते.

व्यक्ती कितीही महान आणि कर्तृत्ववान असली तरी अखेरीस ती एक मनुष्यच आहे. याचे मानसशास्त्रीय दृष्टीने विवेचन चरित्रकार आणि कादंबरीकार दोघेही करू शकतात. व्यक्तीचे भावविश्व उलगडून दाखवताना मानवी मनातील स्वप्न, स्वाभाविक प्रेम, राग, द्वेश, मत्सरादी या भावनांचे उद्रेक हे दोघेही दाखवू शकतात. कल्पनेने समरस झाल्यामुळे कादंबरीकार हे कार्य चांगल्या प्रकारे करू शकतो. ''चरित्रकार आणि चरित्रात्मक कादंबरीचा लेखक शालिन वृत्तीने चरित्रनायकाच्या जीवनाचा शोध आणि कलात्मकरित्या त्याची मांडणी या दोन परस्परभिन्न वाटणाऱ्या गोष्टी एकाच वेळी करीत असतात.''[९] थोडक्यात चरित्रात्मक कादंबरीकाराला कल्पकतेच्या आधाराने, पुराव्याने प्राप्त होणाऱ्या घटनांबरोबर पुरावा नसलेल्या परंतु त्याच्याशी सुसंगत व संभवनीय असलेल्या अशा घटना, स्वभावविशेष, कृती, विचार, विकार इ. चे चित्रण करून आणि चरित्रनायकाच्या



अंतरंगातील सूक्ष्म हालचाली व मानसिक आंदोलने दाखवून त्यांच्या व्यक्तिमत्वास पूर्णत्व देता येते. मराठीत अशा अनेक चरित्रात्मक कादंबऱ्या आहेत. 'शिवकल्याण राजा' (प्रभाकर मराठे), 'हे तो श्रींची इच्छा' (गो. नी. दांडेकर), 'सम्राट अशोक' (नानचंद शहा), 'आनंदी गोपाळ' (आनंदी जोशी) इत्यादी कादंबऱ्या त्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत.

**आत्मचरित्रात्मक कादंबरी**

आत्मचरित्रात्मक कादंबरी या प्रकारात 'आत्मचरित्र' व 'कादंबरी' या दोन स्वतंत्र साहित्यप्रकारांची वैशिष्ट्ये एकत्र आलेली आहेत आत्मचरित्रात्मक कादंबरीमध्ये वास्तव जीवनातील व्यक्तींचे अवतरण झालेले असून या कादंबरीचा नायक प्रत्यक्षातील असतो. लेखकच येथे नायकाची भूमिका वठवत असतो. हा लेखक/ नायक आपला व्यक्तिमत्त्व विकास कसा घडत गेला, ते सांगत असतो. कथनाच्या ओघात आपल्या भोवतालचा परिसर, समाज, रूढी परंपरा, कौटुंबिक जीवन, नातलग, मित्र परिवार, जीवनात घडलेल्या घटना हे सर्व त्यातील सजीवतेसह, चैतन्यासहित रेखाटत असतो. आत्मचरित्रात्मक कादंबरीत 'मी'त्वाचा आविष्कार असतो.

आत्मचरित्रात्मक कादंबरी लिहिणाऱ्या लेखकाला खरेपणासाठी पुराव्याचा, कागदपत्राचा, संबंधित व्यक्तीचा, माहितीचा शोध घ्यावा लागतो. दैनंदिनी, पत्रे, छायाचित्रे, कागदपत्रे याचा उपयोग होतो. अर्थात कलात्मकतेला बाधा येऊ न देता, सच्चेपणा न डागाळता लेखन करायचे आव्हान लेखकाला पेलावे लागते. डॉ. महालक्ष्मी मोराळे म्हणतात त्याप्रमाणे आत्मचरित्रातील 'आत्मपरता' व ललित वाङ्मययातील 'वैश्विकता' यांच्या मिलनातून 'आत्मचरित्रात्मक कादंबरी' हा वाङ्मयप्रकार सिद्ध होतो.[१०] 'कोणा एकाची भ्रमणगाथा' (गो.नी. दांडेकर), 'कोवळे दिवस' (व्यंकटेश माडगुळकर), 'झोंबी' (आनंद यादव), 'मातृका' (पु.शि.रेगे), 'दीपशिखा' (पद्मिनी राजे पटवर्धन) ही काही आत्मचरित्रातमक कादंबऱ्यांची उदाहरणे सांगता येतील.

**राजकीय कादंबरी**

राजकीय कादंबरीचे वेगळेपण स्पष्ट करताना बापट गोडबोले म्हणतात, ''ज्या कादंबरीत त्याच्या विशिष्ट काळातील राजकीय जीवनावर अथवा राजकारणावर प्रकाश टाकला जातो अथवा कल्पित कथानक आणि राजकीय घटना असे दोन धागे घेऊन कथानकाची विन साधली जाते त्या कादंबरीला राजकीय कादंबरी म्हणता येईल.''[११] अर्थात ही व्याख्या ढोबळ आहे. ''जी

प्रकाराला उंची प्राप्त करून दिली आहे.

**समारोप**

सारांशरूपाने असे म्हणता येते की, मानवी मन, जीवन आणि त्या भोवतालचा समाज यांच्या शोधासाठी कटिबद्ध असलेला कादंबरी हा एक वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मय प्रकार आहे. कादंबरीची प्रकृतीच मुळात जीवन सन्मुख अशी आहे. साहित्याच्या अनेक प्रकारांचा विचार करता कादंबरी ही सहज आस्वाद्य, थोडी सैल बांधणीची, मर्यादित बंधनाची आणि भाषांतरानंतरही अंगभूत सौंदर्य कायम टिकवून ठेवणारी, वाचकावर अधिराज्य गाजवणारी आणि माध्यम म्हणून सर्वोत्कृष्ट असणारी अशी आहे. तिचा चित्रफलक विस्तृत असल्याने अनेक आशय केंद्रे तिच्यात समाविष्ट होऊ शकतात. म्हणून विविध घटकांचे एकजीव संघटन आणि वास्तव जीवनाचे विस्तृत चित्रण म्हणजे कादंबरी असे म्हणता येईल.

●●

संदर्भ :


१. सरवटे वि. सी., मराठी साहित्य समालोचन, पृ. ७१
२. मराठे का. बा., नावल आणि नाटक याविषयी निबंध, पृ. १
३. बेडेकर दि. के., साहित्यविचार, पृ. २६६
४. फडके ना. सी., प्रतिभासाधन, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९७७, पृ. १०३
५. कुलकर्णी मदन, मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरूप, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९८४, पृ. १६५
६. थोरात हरिश्चंद्र, कादंबरी : एक साहित्यप्रकार, पृ. ११३
७. तत्रैव, पृ. १००
८. बांदिवडेकर चंद्रकांत, मराठी कादंबरी : स्वरूप आणि प्रवृत्ती, पृ. ११३
९. इनामदार हे. वि., हरिनारायण : व्यक्ती आणि वाङ्मय, आर्यभूषण, पुणे, १९३५, पृ. ३०
१०. शहा विभा, मराठी ऐतिहासिक कादंबरी, मेहता प्रकाशन, पुणे, १९९८, पृ. ६८
११. बापट गोडबोले, मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास, व्हिनस प्रकाशन, पुणे, १९७३, पृ. १८३
१२. कुलकर्णी वा. ल., वाङ्मयातील वादस्थळे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८, पृ. १२२
१३. थोरात हरिश्चंद्र, मराठी वाङ्मयप्रकार, संपा. विजया राज्याध्यक्ष, म.रा.साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, २००२, पृ. २




९.

# नाटक व एकांकिका या साहित्य प्रकाराचे स्वरूप व वाटचाल

डॉ. निवृत्ती कार्वेकर

**नाटक : एक साहित्यप्रकार**

नाटककार एक रंगभूमीशी निगडित वाङ्मयप्रकार आहे. नटांमार्फत रंगमंचावर प्रेक्षकांसमोर सादर करण्यासाठी रचलेली बहुतांशी संवादयुक्त कथा अशी नाटकाची एक व्याख्या करता येते. हा वाङ्मयप्रकार अन्य वाङ्मय प्रकाराप्रमाणे स्वतंत्र व स्वावलंबी नाही. नाटकाचे एक माध्यम शब्द असून कथा, कादंबरी किंवा कथा-काव्य यांच्याप्रमाणे नाटकात पात्रे असतात. नाटकातील पात्रांचे एकमेकांशी संबंध येतात. या संबंधातून कथानक आकार घेते आणि कथानकात कोणती ना कोणती विचारवस्तू वा अनुभव असतो. जीवनाशी जो संघर्ष चालू असतो, त्याचे प्रतिदर्शन म्हणजे नाट्य होय.

नाटक म्हटले की सतत काही घडावे लागते. वर्तमानाकडून भविष्याकडे वाहणारा कृतीचा तो एक प्रवाह असतो. अशा रीतीने एका प्रसंगातून दुसरा प्रसंग वा क्रमाने नाटकात प्रसंगांची किंवा घटनांची सलग मालिका तयार होते. त्यात बाह्य हालचालींबरोबरच आंतरिक घडामोडींचाही समावेश असतो. या कृतीतून नाटक प्रकट होत असते. कथा कादंबरीत निवेदन जे कार्य करते ते कार्य नाटकात कृती करते. नाटकातील संवाद हे बोलण्यासाठी असतात, त्या अर्थाने ती ही कृतीच होय.

अन्य वाङ्मयप्रकाराप्रमाणे जसे कथानक, पात्र त्याप्रमाणे कथानक पात्र आणि विचारवस्तू किंवा अनुभव हीच नाटकाची मूलद्रव्ये असून त्यातून नाटकाचे स्वरूप सिद्ध होते. परंतु कथा, कादंबरी किंवा निवेदनात्मक काव्यात त्यांचा विकास प्रामुख्याने शब्द या माध्यमातून निवेदन,वर्णन किंवा भाष्य या अंगाने होतो, तर नाटकात त्याचा विकास प्रामुख्याने कृतीला अवसर देणाऱ्या

वाटते. कुसुमावती देशपांडे यांना कादंबरी ही मुद्रणकलेचे अपत्य वाटते. तादात्म्य आणि मानुषता ही दोन तत्त्वे त्यांनी कादंबरीत अपेक्षितलेली आहेत.

नीतीतत्व आणि कलात्मक सौंदर्याचे एकत्व वा. म. जोशींनी प्रतिपादले आहेत. श्री. मा. कुलकर्णी यांनी मात्र मानवी जीवनदर्शन घडवणारा वाङ्मय प्रकार म्हणून कादंबरीचा गौरव केला आहे. रसनिर्मिती, सौंदर्यनिर्मिती, कलात्मकता याचे कादंबरी लेखनातील महत्त्व विशद करून गुंतागुंत, निरगाठ, उकल यातून कादंबरी निर्माण करता येते असे ना. सी. फडके यांनी म्हटले आहे. वि. स. खांडेकर यांनी या प्रकाराकडे विचारप्रवर्तक आणि जीवन दर्शन घडवणारा वाङ्मय प्रकार म्हणून बघितले आहे.

श्री. ना. पेंडसे यांनी समग्र मानवी जीवन मांडणारा साहित्यप्रकार असे कादंबरी संदर्भात म्हटले आहे. तर नरहर कुरुंदकर यांनी कादंबरीच्या पोटात इतर अनेक वाङ्मय प्रकार सामावलेले असतात असे सांगून 'कथागुच्छ ते कादंबरी' अशी कादंबरीची संकल्पना मांडली आहे. भालचंद्र नेमाडे यांनी कादंबरीला इंग्रजीतून आलेला वाङ्मय प्रकार मानून सामाजिक गरजेतून तिचा जन्म झाल्याचे मत नोंदविले आहे.

गंगाधर गाडगीळ यांनी घटकाचे व अनुभवांचे कलात्मक संघटन महत्त्वाचे मानले आहे. तर गंगाधर पाटील यांनी कादंबरीला जीवन प्रवाहाबरोबर वाहत जाणारा व्यामिश्र, बहुपेढी, बहूकेंद्री वांङ्:मय प्रकार म्हंटले आहे. थोडक्यात कादंबरीची व्यापकता, लवचिकता व काळाबरोबर प्रवाहीपणाची अपेक्षा उपरोक्त समीक्षकांनी व्यक्त केल्याचे येथे आढळून येते.

**मराठी कादंबरी वाङ्मयाचा स्थूल परिचय**

प्रारंभीच्या काळात इंग्रजी कादंबऱ्यांच्या भाषांतराचा आणि अनुकरण्याचा प्रयत्न झाला. 'यांत्रिकी क्रमण' ही हरी केशवजींनी भाषांतरित केलेली कादंबरी आहे. 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' चे ते भाषांतर आहे. त्यानंतर बाबा पद्मनजी यांनी 'यमुना पर्यटन' ही कादंबरी लिहिली. विधवेच्या करुणाजनक स्थितीचे चित्रण करणाऱ्या, ख्रिस्ती धर्माचा पुरस्कार करणाऱ्या या कादंबरीचा पहिली मराठी कादंबरी म्हणून उल्लेख करावा लागतो. अनेकांनी 'यमुना पर्यटन' ला कादंबरीचा दर्जा दिला नसला तरी, कादंबरीची बीजे जुन्या गद्य वांङ्:मयात आढळतात असे बापट गोडबोलेंसारख्या समीक्षकांना वाटते.

कालांतराने लक्ष्मणशास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला' ही अद्भुतरम्य कादंबरी १८६१ मध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतर रा. भी. गुंजीकर यांची 'मोचनगड' (१८७१)



या ऐतिहासिक स्वरूपाच्या कादंबरीचा जन्म झाला.

खऱ्या अर्थाने मराठी कादंबरी ह. ना. आपटे यांच्या 'पण लक्षात कोण घेतो' पासून सुरू झाली असे मानले जाते. हरिभाऊंच्याच 'मी', 'वज्राघात' पासून सुरू झालेली परंपरा पुढे वा. म. जोशी ('सुशीलेचा देव', 'आश्रमहरिणी', 'इंदू काळे सरला भोळे'), डॉ. श्री.व्यं. केतकर ('गोंडवनातील प्रियवंदा', 'ब्राम्हणकन्या') आदींनी पुढे नेली. मामा वरेरकर ('विधवा कुमारी', 'गोदू गोखले'), ग. त्र्यं. माडखोलकर ('भंगलेले देऊळ'), पु. ल. देशपांडे ('बंधना पलीकडे') यांनीही मराठीचा कादंबरी हा वाङ्मय प्रकार समृद्ध केला. ना. सी. फडके ('दौलत', 'जादूगर'), वि. स. खांडेकर ('उल्का', 'कौंचवध', 'ययाती', 'हिरवा चाफा') या कादंबऱ्यांनी तर कादंबरी वाङ्मय प्रकाराला लौकिक प्राप्त करून दिला.

मनोविश्लेषण आणि संज्ञाप्रवाही तंत्राचा उपयोगही अनेक लेखकांनी केल्याचे निदर्शनास येते. १९४७ नंतर बा. सी. मर्ढेकर ('पाणी', 'रात्रीचा दिवस'), वसंत कानेटकर ('घर', 'पंखा', 'पोरका') या कादंबरीकारांनी मानसशास्त्रीय भूमिकेतून व्यक्तिरेखांचे चित्रण केलेले आहे

शरदचंद्र मुक्तिबोध ('क्षिप्रा', 'सरहद्द') यांनी मार्क्सवादी विचार कादंबरीतून मांडलेले आहेत. तर वि. वा. शिरवाडकर ('वैष्णव'), भालचंद्र नेमाडे ('कोसला', 'बिढार', 'जरीला', 'झूल'), भाऊ पाध्ये ('ब.अनिरुद्ध धोपेश्वरकर', 'वैतागवाडी', 'वासूनाका'), किरण नगरकर ('सात सक्कं बेचाळीस'), कमल देसाई ('काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई') आदींनी वास्तववादी कादंबऱ्या लिहिल्या आहेत. रणजित देसाई ('स्वामी', 'श्रीमान योगी'), ना. स. इनामदार ('शहेशाह', 'झेप', 'झुंज'), शिवाजी सावंत ('मृत्युंजय') यांनी ऐतिहासिक, पौराणिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. कालौघात या कादंबरी वाङ्मय प्रकाराने स्वतंत्र, आकर्षक आणि सुटसुटीत रूप धारण केल्याचे आढळते. त्यामुळे मराठी कादंबरी वेगाने विकसित झाल्याचे दिसते. मराठी कादंबरीचा वास्तववादी, संज्ञाप्रवाही, दलित, झोपडपट्टी, ग्रामीण, प्रादेशिक, आदिवासी, भटके-विमुक्त अशा अनेक अंगांनी व प्रकारांनी विकास व विस्तार झाल्याची दिसून येते. या विकासात श्री. ना. पेंडसे, रा. रं. बोराडे, उद्धव शेळके, गो. नी. दांडेकर, आनंद यादव, श्याम मनोहर, सानिया, केशव मेश्राम, शंकरराव खरात, उत्तम बंडू तुपे, गौरी देशपांडे, अंबिका सरकार, मेघना पेठे, अरुण साधू, हमीद दलवाई, विश्वास पाटील या लेखकांनी सामाजिक, राजकीय, दलित, ग्रामीण कादंबरी लिहून या वाङ्मय